# प्रकरण तिसरे

## संशोधन पध्दत

कोल्हापूर महानगरपालिकेतील स्त्री - पुरूष सदस्यांचा तुलनात्मक अभ्यास या संशोधन प्रबंधासाठी संशोधन पध्दतीमध्ये प्राथमिक माहितीची जमावाजमव स्त्री - पुरूष नगरसेवकांच्या मुलाखतीतून करण्यात आली.

**माहिती संकलन करण्याचे साधनं :-**

प्राथमिक माहिती संकलित करण्यासाठी एक दीर्घ प्रश्नावली तयार करण्यात आली तथापि ही प्रश्नावली नगरसेवक व नगरसेविकांकडे पाठवून देवून ती भरवून आणणे किंवा पोष्टाने पाठवणे असे न करता स्वत: प्रश्न विचारून भरून घेण्यात आली त्यामुळे स्त्री - पुरूष नगरसेवकांचे केवल सर्वेक्षण न करता त्यांच्या सविस्तर मुलाखती घेण्यात आल्या आहेत व सदर मुलाखतीसाठी मार्गदर्शक म्हणून प्रश्नावलीचा वापर करण्यात आला. प्रश्नावलीचा वापर करण्यात आला तसेच या संशोधन प्रबंधासाठी दुय्यम साहित्य म्हणून शिवाजी विद्यापीठामध्ये या विषयाशी सबंधित असलेले प्रोजेक्ट रिपोर्टस्, एम्. फिल. व पीएच. डी. चे प्रबंध शिवाय शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालयामध्ये उपलब्ध असलेली या विषयांशी सबंधित पुस्तके, शिवाजी विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्रात उपलब्ध असलेले या विषयांशी सबंधित साहित्य या सर्वांचा संदर्भ ग्रंथ म्हणून वापर करण्यात आला याशिवाय वृत्तपत्रे व महानगरपालिकेच्या दरवर्षीच्या डायऱ्याही अभ्यासल्या आहेत.

सदर अभ्यास कोल्हापूर महानगरपालिकेतील स्त्री - पुरूष सदस्यांचा तुलनात्मक सुक्ष्म अभ्यास असल्यामुळे एकूण ७७ नगरसेवकांपैकी (यापैकी ३ जागा रिक्त) ६१ नगरसेवकांच्या मुलाखती घेतल्या आहेत.सदर नगरसेवकांनी जातीचा दाखला खोटा दिल्यामुळे जागा रिक्त राहिल्या आहेत. संशोधनासाठी त्यातील नमुना घेणे असा मार्ग न स्वीकारता सर्व नगरसेवकांपर्यत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला. तथापि वारंवार प्रयत्न करुनही कांही नगरसेवकापर्यत पोहचणे शक्य झाले नाही. सदर अभ्यासात ६१ सदस्यांच्या मुलाखतींच्या आधारे स्त्री - पुरूष तुलना करण्यात आली आहे. ६१ उत्तरदात्यांमध्ये २७ स्त्रिया व ३४ पुरुष यांचा समावेश करण्यात आला आहे. सर्व मुलाखती मी स्वत: प्रत्यक्ष

घेतल्या असून मुख्यत: महानगरपालिका अगर सदस्यांच्या घरी जावून मुलाखती पूर्ण केल्या आहेत. प्रत्येक मुलाखत सुमारे सव्वातास चालत असे. भेटीची वेळ ठरवूनही ठरलेल्या वेळेत मुलाखत न होणे. ही अडचण ठळकपणे जाणवली. तरीही ७७ प्रभागापैकी ६१ प्रभागातील सदस्यांच्या मुलाखती पूर्ण झाल्या आहेत. ८०% नगरसेवक अभ्यासात समाविष्ट आहेत. यामध्ये एकूण सदस्यात १४ इतके ओ बी सी सदस्य कार्यरत आहेत. एस. सी ७ एस. टी नगरसेवकांची संख्या १ इतकी आहे. एकूण ७७ सदस्यांमध्ये २७ स्त्री सदस्या असून त्यापैकी २६ महिला आरक्षित प्रभागातून निवडन आल्या आहेत. तर एक नगरसेविका ओ. बी. सी. खुल्या प्रवर्गतून निवडून आली आहे. एकूण २७ पैकी दोन स्त्रिया दुसऱ्यांदा नगरसेविका म्हणून निवडून आल्या आहेत. या २७ नगरसेविकापैकी ७ इतक्या नगरसेविका हया पूर्वाश्रमीच्या नगरसेवकांच्या पत्नी आहेत तर ५ नगरसेवकांच्या पत्नी ही यापूर्वी नगरसेविका होत्या. पत्नीच्या कार्यावर निवडूण आलेले सदस्य म्हणून श्री. शेखर घोटणे यांचे नाव घ्यावे लागेल. या मुलाखतीत स्त्री-पुरूष विविध जाती, राजकीय पक्ष. तसेच महानगरपालिकेतील सदस्यांचे योग्य प्रतिनिधित्व असल्यामुळे सदर अभ्यास कोल्हापूर महानगरपालिकेतील सदस्यांचे यथार्थ प्रतिनिधित्व करणारा अभ्यास आहे. विशेषत: सर्वच्या सर्व २७ स्त्री नगरसेविकांच्या मुलाखती घेतल्या असल्यामुळे त्यांचे १००% प्रतिनिधित्व झाले आहे.

६१ महानगरपालिका सदरयांच्या मुलाखतीतून मिळालेल्या संख्यात्मक माहितीचे विश्लेषण घेण्यासाठी M.S.EXCEL हे SOFTWEAR वापरण्यात आले आहे. संख्यात्मक माहितीचे सादरीकरण करताना मुख्यत्वे टक्केवारीच्या स्वरूपात आकडेवारी सादर केली असून विचारलेल्या प्रत्येक प्रश्नात यासंदर्भात स्त्री - पुरूष तुलना हा उददे्श ठेवला आहे. तसेच उपलब्ध साहित्य आणि नियतकालिकांमधील लेख हे संदर्भ साहित्यम्हणून वाचले आहे.

**<u>महानगरपालिका निवड करण्याचा निकष :-</u>**

कोल्हापूर महानगरपालिका ही महिला आरक्षणाची अंमलबजावणी झाल्यानंतर पहिली निवडणूक जिथे झाली .अशी महानगरपालिका आहे. आधि राज्यस्तरिय आरक्षण आणि पुढे घटनादत्त आरक्षण अंमलात आल्यावर आजवर कोल्हापूर महानगरपालिकेच्या ४ निवडणूका १९९०, १९९५, २०००, २००५ या वर्षामध्ये झाल्या आहेत. त्या दृष्टीने कोल्हापूर मनपातील

स्त्री - पुरुष सदस्यांची तुलना करणे औचित्यपूर्ण आहे. स्दर अभ्यास कुठल्याही अर्थ सहाय्याशिवाय केला असल्यामुळे महानगरपालिकेची भौगोलिक समीपता हा निकषही निर्णायक ठरला. कोल्हापूर महानगरपालिकेचा या अभ्यासाच्या दृष्टीने आवश्यक तपशील पुढील प्रमाणे.

## कोल्हापूर महानगरपालिका :-

बहुजन हिताय । बहुजन सुखायं । हे ब्रीद असलेल्या कोल्हापूर नगरपालिकेची स्थापना १२-१०-१८५४ मध्ये झाली. महाराणी ताराराणी व छत्रपती राजर्षी शाहूंचा वारसा सांगणाऱ्या कोल्हापूर नगरपालिकेचे १५-१२-१९७२ रोजी महानगरपालिकेत रूपांतर झाले. कोल्हापूर महानगरपालिकेच्या स्थापनेपासून १९७७ पर्यंत तिची निवडणूक झाली नाही. १९७२ ते १९७८ पर्यंत भारतीय प्रशासकीय सेवेतील आयुक्तच प्रशासक म्हणून कारभार पहात होते. १९७८ मध्ये महानगरपालिकेची पहिली निवडणूक झाली त्याअगोदर नगरपालिका असताना १९२७ च्या बॉम्बे म्युनिसीपल ब्युरोॲक्टद्वारे नगरपालिकेवर दोन महिला नियुक्त करण्यात आल्या. १९४५ मध्ये महिलासाठी राखून ठेवलेल्या तीन जागांवर प्रथम महिला निवडून आल्या. मात्र सरकारनियुक्त नगरसेविका नेमण्याची पध्दत संस्थान विलीन होईपर्यंत म्हणजे १९४९ पर्यंत चालूच राहिली .त्यानंतर १९५२ साली प्रौढ मताधिकाराच्या तत्वावर निवडणूक झाली. एकूण ४४ जागांच्या पालिकेमध्ये चार जागा महिलासाठी राखीव होत्या. परंतु या राखीव जागांशिवाय सर्वसाधारण जागेसाठी १९७० पर्यंत महिला उमेदवार उभ्या राहिल्याच नाहीत. १९५२ पर्यंत तर नगरसेविकांची पालिकेच्या सभागृहात अनुपस्थितीच अधिक जाणवे. १९२६ ते १९४६ पर्यंत नियमित उपस्थिती असणाऱ्या फक्त श्रीमती इंदीराबाई देशपांडे या एकट्याच दिसतात. १९५२ पासून विरोधी पक्षाच्या स्थानिक नेत्या (१) श्रीमती उर्मीला सबनीस (समाजवादी) (२) श्रीमती विमला बागल (शे.का.पक्ष) (३) श्रीमती शकुंतला पाटील (लाल निशाण), यांची उपस्थिती व सहभाग जाणवतो. श्रीमती इंदीराबाई देशपांडे यांनी आपल्या मतदारसंघातील पाणी, वीज रस्ते यासंबंधीच्या तक्रारी दूर केल्यामुळे मतदारांनी कृतज्ञता व्यक्त करण्याकरीता त्यांचा सत्कार केला होता. अशाप्रकारच्या सत्काराचे हे एकच उदाहरण असावे. श्रीमती शकुंतला पाटील यांनी नगराध्यक्षपदाची निवडणूक लढवून, संस्थानी वातावरणात वाढलेल्या महिलाही सामाजिक व राजकीय जीवनात मागासलेल्या राहिल्या नाहीत हे सिध्द केले आहे. १६-८-१९७८ ला कै.श्री. जाधव (कसबेकर) नारायण उर्फ बाबासाहेब धोडींराम यांची महापौर म्हणून तर मुळे श्री. बाळासाहेब कृष्णाजी यांची उपमहापौरपदी नेमणूक झाली. श्री. जयश्री बबेराव जाधव यांची कोल्हापूर महानगरपालिकेतील पहिली महापौर म्हणून १६-११-१९९४

ला निवड झाली. आतापर्यंत श्रीमती. जयश्री जाधव, श्रीमती. कांचन कवाळे व सध्याच्या श्रीमती. सई खराडे या तिधींनी महापौरपद भूषविले आहे. तर श्रीमती. मालती आनंदराव हळदकर, श्रीमती. सुलोचना बंडोपंत नाईकवडे, श्रीमती. सरस्वती मुरलीधर पोवार, श्रीमती. सुशीला धोंडिराम पोवार, श्रीमती. प्रार्थना प्रव्ण समर्थ या ५ जणींनी उपमहापौर पद भुषविले आहे.

महानगरपालिकेच्या १९७८ ते १९८४ पर्यंतच्या एकूण ६० सदस्यांमध्ये एकही निर्वाचित महिला सदस्य नव्हती, तर १९८५-१९९० पर्यंतच्या एकूण ६० सदस्यांमध्येही एकही निर्वाचित महिला सदस्या नव्हती.१९९० साली महाराष्ट्र शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ३० टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या त्यामुळे १९९० ते १९९५ पर्यंतच्या ६० सदस्यांमध्ये महिलांची संख्या १८ इतकी झाली, तर १९९५ ते २००० पर्यंतच्या ७२ सदस्यांमध्ये महिला सदस्यांची संख्या २२ इतकी होती. तर २००० ते २००५ मधील एकूण ७२ सदस्यांपैकी २३ महिला सदस्या होत्या. आक्टोंबर २००५ मध्ये निवडून आलेल्या ७७ सदस्यांपैकी २६ महिला या महिलासाठी राखीव जागांवर निवडून आल्या आहेत तर श्रीमती तेजस्विनी घोरपडे ही महिला ओ. बी. सी. सर्वसाधारण या मतदारसंघातून निवडून आल्या आहेत. महापौरपदाचा कालावधी २.५ वर्षाचा असला तरी सत्तेच्या साठमारीनध्ये जिथे महोपौरपदी असलेली व्यक्ती दर ४-६ महिन्यांनी बदलण्याचे अनिष्ठ प्रथा गेल्या काही काळात रूजली आहे. तिथे श्रीमती सई खराडे या महापौरांनी मात्र १० महिन्यानंतर राजीनामा दयायचे नाकारून आपला२.५ वर्षांचा महापौरपदाचा कार्यकाल पूर्ण केला आहे. श्रीमती सई खराडे यांनी ३३ वे महापौर म्हणून काम पाहिले आहे. महानगरपालिकेचे एकूण क्षेत्रफळ ६६.८२ कि. मी. आहे. तर लोकसंख्या २००१ साली ४९३ ,१६७ इतकी होती यामध्ये पुरूष २,५१,९५८ तर स्त्रिया २,३३,२२५ इतक्या होत्या. सध्या सक्रिय असलेले महानगरपालिका सदस्य आक्टोंबर २००५ च्या निवडूणकीत निवडून आलेले आहेत.

कोल्हापूर महनगरपालिकेत सध्या ४ समित्या कार्यरत आहेत. यापैकी महिला व बालकल्याण या समितीमध्ये सदस्य आहेत. वैशिष्टय म्हणजे हे सर्व सदस्य महिलाच आहेत. तर स्थायी या महत्वाच्या समितीच्या एकूण सदस्यांची संख्या १६ इतकी आहे त्यामध्ये ३ महिला आहेत. तर परिवहन समितीमध्ये एकूण १३ इतके सदस्य आहेत त्यामध्ये २ इतक्या महिला आहेत तर प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये १२ सदस्य असून यापैकी महिला ७ आहेत.

# प्रकरण चौथे

## माहितीचे सादरीकरण आणि विश्लेषण

महाराष्ट्रातील एकूण २२ महानगरपालिकांपैकी कोल्हापूर महानगरपालिका ही एक आहे. कोल्हापूर महानगरपालिकेची स्थापना १२ ऑक्टोबर १८५४ झाली. तर नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर १५ डिसेंबर १९७२ साली झाले. १९७२ ते १९७८ पर्यंत प्रशासकच कोल्हापूर महानगरपालिकेचा कारभार पहात होते. १९७८ साली कोल्हापूर महानगरपालिकेची पहिली निवडणुक झाली. १९७८ पासून १९९३ पर्यंत एकही स्त्री महापौर होऊ शकली नाही.

आरक्षण मिळाल्यानंतर १६ नोव्हेंबर १९९४ ला श्रीमती जयश्री बबेराव जाधव. या कोल्हापूर महानगरपालिकेच्या पहिल्या महापौर झाल्या त्यानंतर श्रीमती कांचन शिवाजी कवाळे व श्रीमती सई अजित उर्फ इंद्रनिल खराडे या कोल्हापूर महानगरपालिकेच्या अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या महापौर झाल्या.

कोल्हापूर महानगरपालिकेतील स्त्री-पुरुष सदस्यांच्या मुलाखतीमधून प्राप्त झालेल्या संख्यात्मक व गुणात्मक माहितीच्या आधारे स्त्री-पुरुष सदस्यांची तुलना । प्रकरणात केली आहे. सदर कोल्हापूर महानगरपालिकेचा अभ्यासाच्या दृष्टिने आवश्यक तपशील पुढील प्रमाणे.

१. वयानुसार कोष्टक

| वय | स्त्री व पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| २५ ते ३५ | ४ | १० | १४ |
| | २८.५७% | ७१.४३% | १००.००% |
| | ६.५६% | १६.३९% | २२.९५% |
| | ११.७६% | ३७.०४% | २२.९५% |
| ३६ ते ४५ | २० | १३ | ३३ |
| | ६०.६१% | ३९.३९% | १००.००% |
| | ३२.७९% | २१.३१% | ५४.१०% |
| | ५८.८२% | ४८.१५% | ५४.१०% |
| ४६ ते ५५ | १० | ४ | १४ |
| | ७१.४३% | २८.५७% | १००.००% |
| | १६.३९% | ६.५६% | २२.९५% |
| | २९.४१% | १४.८१% | २२.९५% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| एकूण टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

वरील कोष्टकामध्ये दर्शवल्याप्रमाणे २५ ते ३५ या वयोगटातील एकूण १४ नगरसेवकापैकी ४ पुरुष व १० स्त्रिया आहेत त्याची मुलाखत घेतलेल्या ६१ नगर सेवकांशी तुलना करता ते प्रमाण अनुक्रमे ६.५६ % व १६.३९ % इतके आहेत. तर एकूण मुलाखत घेतलेल्या पुरुषांशी तुलना करता हे प्रमाण ११.७६ टक्के आहे तर एकूण मुलाखत घेतलेल्या स्त्रियांशी तुलना करता हे प्रमाण ३७.०४ टक्के आहे. यावरुन २५ ते ३५ वयोगटामध्ये

महानगरपालिकेमध्ये प्रविष्ट होणाऱ्यामध्ये पुरुषांच्या तुलनेतही स्त्रियांना महानगरपालिकेतील सदस्यत्वाची संधी लहान वयात असूनही अधिक मोठ्या प्रमाणात मिळाल्याचे आढळते. ३६ ते ४५ या वयोगटामध्ये एकूण ३३ नगरसेवक असून त्यापैकी २० पुरुष १३ स्त्रियांचा समावेश आहे. त्यांची मुलाखत घेतलेल्या ६१ नगर सेवकांशी तुलना करता ते प्रमाण अनुक्रमे ३२.७९ % व २१.३१% इतके आहे. तर एकूण मुलाखत घेतलेल्या पुरुषांशी तुलना करता हे प्रमाण ५८.८२ टक्के इतकी आहे तर एकुण मुलाखत घेतलेल्या स्त्रियांशी तुलना करता हे प्रमाण ४८.१५ टक्के इतकी आहे. ४६ ते ४५ या वयोगटातील १४ नगरसेवकापैकी १० नगरसेवक व ४ नगरसेविका आहेत. त्यांचे एकूण मुलाखत घेतलेल्या नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते अनुक्रमे १६.३९% व ६.५६ % इतके आहे.

यावरुन असे म्हणता येईल की सार्वाधिक नगरसेवक व नगरसेविका ३६ ते ४५ या वयोगटातील असून त्यांची मुलाखत घेतलेल्या एकूण सदस्यांचे प्रमाण पाहता ते ५४.१०% इतके आहे. तरुण वर्गातील म्हणजे २५ ते ३५ वयोगटातील स्त्री-पुरुष सदस्यांचे प्रमाण सर्वात कमी असल्याचे दिसते त्यांचे एकूण मुलाखत घेतलेल्या सदस्यांचे प्रमाण पाहता ते २२.९५ इ. आहे. ४६ ते ५५ या वयोगटातील नगरसेवकांची संख्या २५ ते ३५ वयोगटातील नगरसेवका इतकेच म्हणजे १४ असून पण त्याचे प्रमांण व्यस्त आहे. २५ ते ३५ या वयोगटात ४ पुरुष व १० स्त्रिया आहेत. ४६ ते ५५ या वयोगटामध्ये १० पुरुष ४ स्त्रिया यांचा समावेश आहे.

सर्वसाधारणपणे वयाच्या ५० नंतर स्त्री - पुरुषांच्या आपल्या संसारातील जबाबदाऱ्या कमी होतात. व त्यामुळे त्याना सामाजिक राजकीय कामात कार्यात भाग घ्यायला फुरसत मिळते. असा जो समाज आहे.तो इथे मात्र थोडा बदलेला दिसतो .म्हणजे ४६ वर्षानंतर निवडून येणाऱ्या स्त्री पुरुषांचे प्रमाण थोडे कमी दिसते तर ज्यांना प्रौढ म्हणता येईल अशा सदस्यांचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे दिसते.



15247

२.जातीनुसार कोष्टक

| जात | स्त्री व पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| ओ.बी.सी. | ९ | ९ | १८ |
| | ५०.००% | ५०.००% | १००.००% |
| | १४.७५% | १४.७५% | २९.५१% |
| | २६.४७% | ३३.३३% | २९.५१% |
| एस. सी. | ४ | ३ | ७ |
| | ५७.१४% | ४२.८६% | १००.००% |
| | ६.५६% | ४.९२% | ११.४८% |
| | ११.७६% | ११.११% | ११.४८% |
| एस. टी. | | १ | १ |
| | ०.००% | १००.००% | १००.००% |
| | ०.००% | १.६४% | १.६४% |
| | ०.००% | ३.७०% | १.६४% |
| मराठा | २१ | १४ | ३५ |
| | ६०.००% | ४०.००% | १००.००% |
| | ३४.४३% | २२.९५% | ५७.३८% |
| | ६१.७६% | ५१.८५% | ५७.३८% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| एकूण टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

महानगरपालिकेमध्ये एकूण मुलाखत घेतलेल्या ६१ नगरसेवकांपैकी १८ नगरसेवक ओ.बी.सी. या प्रवर्गातील निवडून आले आहेत यामध्ये ९ पुरुषांचा व ९ स्त्रियांचा समावेश

होतो त्यांची एकू ण मुलाखत घेतलेल्या नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते प्रत्येकी १४.७५ % इतके आहे.

त्यातील एक नगर सेविका तेजस्विनी घोरपडे या ओ. बी. सी. सर्वसाधारण प्रभागातून निवडून आल्या आहेत. त्यांच्या विरुद्ध ३ पुरुष उमेदवार उभे होते.

एस.सी. नगरसेवकाची महानगरपालिकेतील एकू ण संख्या ७ आहे.यामध्ये ४ पुरुष व ३ स्त्रिया आहेत. त्यांची मुलाखत घेतलेल्या एकूण ६१ नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते ६.५६% व ४.९२% इतके दिसते. एस. सी. उमेदवारामध्ये श्री अनिल आवळे हे खुल्या प्रवर्गातून निवडून आले आहेत त्यांनी खुल्या प्रवर्गातील ८ उमेदवारांच्या अमानत रक्कमाही जप्त केल्या आहेत. एस. टी. प्रवर्गातील एकच महिला उमेदवार दिसते. मराठा जातीचे एकू ण ३५ नगर सेवक निवडून आले आहेत. त्यापैकी २१ पुरुष असून १४ स्त्रिया आहेत . मुलाखत घेतलेल्या एकूण ६१ नगर सेवकांचे प्रमाण पाहता ते अनुक्रमे ३४.४३ % व २२.९५% इतके आहे.

निवडून आलेल्या उमेदवारामध्ये १२ नगरसेवक हे यापूर्वी निवडून आले होते त्यामध्ये श्रीमती मनिषा बुचडे व श्रीमती सई खराडे या स्त्री सदस्यांचा समावेश आहे.

३.शिक्षणविषयक कोष्टक

| शिक्षण | स्त्री व पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| नाही | | १ | १ |
| | **०.००%** | **१००.००%** | **१००.००%** |
| | *०.००%* | *१.६४%* | *१.६४%* |
| | ०.००% | ३.७०% | १.६४% |
| ३वी | | १ | १ |
| | **०.००%** | **१००.००%** | **१००.००%** |
| | *०.००%* | *१.६४%* | *१.६४%* |
| | ०.००% | ३.७०% | १.६४% |
| ७वी | ५ | २ | ७ |
| | **७१.४३%** | **२८.५७%** | **१००.००%** |
| | *८.२०%* | *३.२८%* | *११.४८%* |
| | १४.७१% | ७.४१% | ११.४८% |
| १० वी | २ | ७ | ९ |
| | **२२.२२%** | **७७.७८%** | **१००.००%** |
| | *३.२८%* | *११.४८%* | *१४.७५%* |
| | ५.८८% | २५.९३% | १४.७५% |
| १२वी | १२ | ६ | १८ |
| | **६६.६७%** | **३३.३३%** | **१००.००%** |
| | *१९.६७%* | *९.८४%* | *२९.५१%* |
| | ३५.२९% | २२.२२% | २९.५१% |
| पदवी | ११ | १० | २१ |
| | **५२.३८%** | **४७.६२%** | **१००.००%** |
| | *१८.०३%* | *१६.३९%* | *३४.४३%* |
| | ३२.३५% | ३७.०४% | ३४.४३% |
| पदव्युत्तर | ३ | | ३ |
| | **१००.००%** | **०.००%** | **१००.००%** |
| | *४.९२%* | *०.००%* | *४.९२%* |
| | ८.८२% | ०.००% | ४.९२% |
| व्यावसायिक शिक्षण | १ | | १ |
| | **१००.००%** | **०.००%** | **१००.००%** |
| | *१.६४%* | *०.००%* | *१.६४%* |
| | २.९४% | ०.००% | १.६४% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | **५५.७४%** | **४४.२६%** | **१००.००%** |
| एकूण टक्केवारी | *५५.७४%* | *४४.२६%* | *१००.००%* |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

वरील कोष्टकामध्ये स्त्री-पुरुष नगरसेवकांमध्ये शिक्षित व अशिक्षित नगरसेवकांचे प्रमाण पुढीलप्रमाणे दिसते. अगदीच शिक्षण न घेतलेल्या मध्ये श्रीमती मंगल बाबासाहेब ठोकळे यांचा समावेश होतो. तिसरी शिक्षण झालेल्या श्रीमती सुनिता हवलदार ह्या एकट्याच आहेत त्यातील ७ वी पर्यत शिक्षण घेतलेले एकूण ७ नगरसेवक आहेत त्यातील ५ पुरुष व २ नगरसेविका आहेत. ६१नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते ८.२० %व ३.२८%आहेत. पदवी पर्यत शिक्षण घेतलेल्या २१ नगसेवकांचा समावेश होतो. त्यामध्ये ११ पुरुष व १० स्त्रियांचा समावेश होतो. एकूण मुलाखत घेतलेल्या ६१ नगरसेवकांशी तुलना करता ते प्रमाण १८.३% व १६.३९% इतके आहे.

तर पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्यामध्ये फक्त ३ पुरुष नगसेवाकांचाच समावेश होतो. त्यापैकी शेखर घोटणे हे . बी. कॉम, एम. ए. असून श्री . अमोल माने हे एम. ए. आहेत.तर सुनिल मोदी हे एम. ए. आहेत.तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्यामध्ये फक्त एकच नगरसेवक श्री. महेश सावंत यांचा समावेश होतो. वरील माहिती वरून असे दिसून येते की मुलाखत घेतलेल्या एकूण ६१ नगरसेवकापैकी अर्ध्यापेक्षा अधिक उमेदवार हे जेमतेम १२ वी पेक्षा अगर त्यापेक्षाही कमी शिक्षण घेतलेले आहेत. तर पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या २१ नगरसेवक व नगरसेविकांचा तर २ उच्च पदवीधर सदस्य महानगरपालिका मध्ये आहेत. आजपर्यंत सर्व साधारणपणे शिकलेले लोक नगरपालिकेच्या राजकारणाकडे वळत नाहीत असा एक समज समाजामध्ये प्रचलित होता . त्याला तडा गेल्याचे किंवा तो मागे पडल्याचे दिसते.

रोहिणी गवाणकरांनी मराठी स्त्री शक्तीचे राजकारणी रूप या पुस्तकात असे म्हटले आहे की, अल्पशिक्षित किंवा अशिक्षित स्त्रिया या क्षेत्राकडे वळलेल्या दिसत नाहीत. शिक्षित (१२ वी, पदवी धारक ) स्त्रिया या क्षेत्रात जास्त दिसतात त्या मानाने उच्चशिक्षित स्त्रियांची संख्या या राजकीय क्षेत्रात कमी दिसते. यावरुन शिक्षण हा राजकीय सहभागासाठी एक प्रभावी घटक आहे, असे दिसून येते . पदवीधरांमध्ये पुरुषांपेक्षा जास्त संख्या असल्यामुळे उच्च शिक्षित स्त्रियांना

प्रतिनिधित्वाची संधी मिळविणे अधिक सोपे जाते असे दिसते. त्याची प्रस्तुत अभ्यासाची पुष्टी मिळते.

४.व्यवसायानुसार कोष्टक

| व्यवसाय | स्त्री व पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| उद्योग | २४ | १ | २५ |
| | **९७.५०%** | **२.५%** | **१००.००%** |
| | *७०.५९%* | *३.७०%* | *४०.९८%* |
| | <u>३९.३४%</u> | <u>१.६४%</u> | *४०.९८%* |
| अन्य | २ | | २ |
| | **१००.००%** | **०.००%** | **१००.००%** |
| | *३.२८%* | *०.००%* | *३.२८%* |
| | <u>५.८८%</u> | <u>०.००%</u> | <u>३.२८%</u> |
| गृहिणी | | २६ | २६ |
| | **०.००%** | **१००.००%** | **१००.००%** |
| | *०.००%* | *४२.६२%* | *४२.६२%* |
| | <u>०.००%</u> | <u>९६.३०%</u> | <u>४२.६२%</u> |
| नोकरी | २ | | २ |
| | **१००.००%** | **०.००%** | **१००.००%** |
| | *३.२८%* | *०.००%* | *३.२८%* |
| | <u>५.८८%</u> | <u>०.००%</u> | <u>३.२८%</u> |
| शेती | ६ | | ६ |
| | **१००.००%** | **०.००%** | **१००.००%** |
| | *९.८४%* | *०.००%* | *९.८४%* |
| | <u>१७.६५%</u> | <u>०.००%</u> | <u>९.८४%</u> |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | **५५.७४%** | **४४.२६%** | **१००.००%** |
| एकूण टक्केवारी | *५५.७४%* | *४४.२६%* | *१००.००%* |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | <u>१००.००%</u> | <u>१००.००%</u> | <u>१००.००%</u> |

स्वत:चा उद्योग-व्यवसाय करणाऱ्यांमध्ये २५ पुरुष व फक्त १ नगरसेविकेचा समावेश होतो.श्रीमती आशा महाजन यांचे स्वतःचे ब्युटी पार्लर आहे, सौ. लता कदम याही व्यवसाय व गृहिणी ही दोन्ही कामे साभांळतात. पण त्या स्वतंत्रपणे व्यवसाय करीत नाहीत, तर आपल्या पतीच्या दुकानात त्यांच्या साहाय्याने उद्योग बघतात या पुरुष नगरसेवकाच्या एकूण मुलाखत घेतलल्या ६१ नगरसेवकांशी प्रमाण पाहता ३९.३४ % इतके येते.

अनिल आवळे हे व्यवसाय व सामाजिक कार्य करणारे आहेत असे सांगतात तर श्री. संभाजी जाधव हे उद्योग, नोकरी, शेती यापैकी काहीच करीत नाहीत. म्हणून त्यांनी अन्य हा पर्याय दिला आहे. एकूण मुलाखत घेतलेल्या २६ नगरसेविका गृहिणी आहेत. त्यांच्या मुलाखत घेतलेल्या नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते ९६.३० % इतके आहे. नोकरी करणाऱ्यामध्ये २ नगरसेवकांचा समावेश होतो. शेती करणाऱ्यामध्ये ६ नगरसेवकांचा समावेश होतो तर एकही नगरसेविका नोकरी करीत नाही. शेती करणाऱ्यामध्ये ६ नगरसेवकांचा समावेश होतो. त्यांची मुलाखत घेतलेल्या एकूण नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते ९.३४ % इतके आहे. यावरून सार्वाधिक नगरसेवक उद्योग करणारे असून सर्वात कमी नगरसेवक नोकरी करणारे आहेत असे दिसून येतं तर स्वतः अर्थार्जन करणाऱ्या नगसेवकामध्ये फक्त १ नगरसेविकेचा समावेश होतो. नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण इतके कमी असण्याचे कारण घरचे काम व नोकरी करुन या स्त्रियांना राजकारणासाठी किंवा समाजकार्य करण्यासाठी वेळ नसतो हे ही कारण असू शकते.

ह्या २५ गृहिणी राजकारणात येण्यामागचे कारण पाहिले तर त्यातील बहूतेक नगरसेविकांचे पती किंवा घरचे कोणीतरी राजकारणात सक्रिय होते. पण प्रभाग महिला राखीव झाल्यामुळे हातची सत्ता जाऊ नये. म्हणून गृहिणींना निवडणुकीस उभे राहण्याची संधी मिळाली असे म्हणावे लागेल.

## ५. राजकारणातील अनुभव विषयक कोष्टक

| राजकारणातील अनुभव | स्त्री व पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| निवडून येण्याअगोदर राजकीय अनुभव नव्हता | १३ | १९ | ३२ |
| | **४०.६३%** | **५९.३८%** | **१००.००%** |
| | *२१.३१%* | *३१.१५%* | *५२.४६%* |
| | ३८.२४% | ७०.३७% | ५२.४६% |
| ५ वर्षे | ६ | | ६ |
| | **१००.००%** | **०.००%** | **१००.००%** |
| | *९.८४%* | *०.००%* | *९.८४%* |
| | १७.६५% | ०.००% | ९.८४% |
| १० वर्षे | ७ | २ | ९ |
| | **७७.७८%** | **२२.२२%** | **१००.००%** |
| | *११.४८%* | *३.२८%* | *१४.७५%* |
| | २०.५९% | ७.४१% | १४.७५% |
| १५वर्षे | २ | ३ | ५ |
| | **४०.००%** | **६०.००%** | **१००.००%** |
| | *३.२८%* | *४.९२%* | *८.२०%* |
| | ५.८८% | ११.११% | ८.२०% |
| २० वर्षापेक्षा अधिक काळ | ६ | ३ | ९ |
| | **६६.६७%** | **३३.३३%** | **१००.००%** |
| | *९.८४%* | *४.९२%* | *१४.७५%* |
| | १७.६५% | ११.११% | १४.७५% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | **५५.७४%** | **४४.२६%** | **१००.००%** |
| एकूण टक्केवारी | *५५.७४%* | *४४.२६%* | *१००.००%* |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

राजकीय अनुभवाच्या कोष्टकामध्ये निवडून आल्यापासून राजकारणाचा अनुभव आहे असे म्हणणाऱ्या नगरसेवकांच्या मध्ये १३ पुरुषांचा व १९ स्त्रियांचा समावेश होतो. त्यांचे निवडून आलेल्या ६१ नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते अनुक्रमे २१.३१ % व ३१.१५ % इतके दिसते. किमान पाच वर्षे राजकारणाचा अनुभव आहे असे म्हणणाऱ्यामध्ये ६ नगरसेवकांचा समावेश होतो त्यांचे मुलाखत घेतलेल्या एकूण नगरसेवकांशी प्रमाण पाहता ९.८४ % इतके आहे. पाच वर्षे राजकीय अनुभव असणाऱ्यामध्ये एकही स्त्री नगरसेविका नाही. १० वर्षे इतका अनुभव पाठीशी असणाऱ्या मध्ये ७ पुरुष व २ स्त्रियांचा समावेश होतो यांचे मुलाखत घेतलेल्या लोकांशी प्रमाण पाहता ११.४८ % व ३.२८ % इतके आहे. २ नगरसेविकापैकी श्रीमती मृदुला पुरेकर यांचे पती यापूर्वी नगरसेवक होते त्यामुळे त्यांच्याबरोबर श्रीमती मृदुलाही राजकारणात सक्रिय झाल्या होत्या. तर दुसऱ्या नगरसेविका श्रीमती संगिता काटकर या १९९५ च्या नगरपालिकेच्या निवडणुकीला उभ्या राहिल्या होत्या पण त्यांना अपयश आले. १५ वर्षापेक्षा जास्त राजकीय अनुभव पाठीशी असलेल्या मध्ये २ नगरसेवक व ३ नगरसेविकांचा समावेश होतो. त्यांची मुलाखत घेतलेल्या एकूण ६१ नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते ३.२८ % व ४.९२ % इतके दिसते. २० वर्षापेक्षा अधिकाळ राजकारणात सक्रीय असणाऱ्यामध्ये ६ पुरुष व ३ महिला सदस्यांचा समावेश होतो. त्यांचे मुलाखत घेतलेल्या एकूण ६१ नगरसेवकांशी प्रमाण अनुक्रमे ९.८४ % व ४.९२ % इतके दिसते .

२० वर्षापेक्षा अधिक इतका प्रदीर्घ राजकीय अनुभव असणाऱ्यामध्ये मधूकर रामणे, निलेश देसाई ,सदाशिव बसूगडे व प्रकाश मोहिते यांचा समावेश होतो यापैकी श्री. सदाशिव बसुगडे हे १९७८ पासून सक्रिय आहेत. ते १९७८ ते १९७५ साली नगरसेवक म्हणून निवडून आले . तर १९९० मध्ये त्यांच्या पत्नी श्रीमती शोभा बसुगडे ह्या निवडून आल्या होत्या. श्री .प्रकाश मोहिते १९९५ साली नगरसेवक म्हणून निवडून आले होते. २००० साली त्यांच्या पत्नी श्रीमती यशोदा मोहिते ह्या निवडून आल्या तर स्त्रियामध्ये श्रीमती लता कदम, श्रीमती सुषमा पवार, श्रीमती माधुरी साळोखे यांचा राजकीय अनुभव २० वर्षापेक्षा जास्त आहे. तिघीच्याही माहेरी राजकीय घराणे आहे. व लग्नानंतर सासरी पती सक्रिय आहे त्यामुळे यापूर्वी प्रत्यक्ष अनुभव पाठीशी नसला तरी त्यांचा राजकीय सहभाग मात्र होता.

वरील विश्लेषणावरुन आपण असे म्हणू शकतो की नवनिर्वाचित नगसेवकांची लक्षणीय संख्या या महानगरपालिकेच्या सदस्यामध्ये दिसते. २० वर्षापर्यंत त्यांच्या किंवा त्या

पेक्षाही अधिक दीर्घ अनुभव असणारे फारच थोडे नगरसेवक व नगरसेविका महानगरपालिकेमध्ये दिसतात.

ऑक्टोबर २००५ पासून राजकीय अनुभव पाठीशी आहे असे म्हणणाऱ्या १९ नगसेविका या वार्ड महिला आरक्षित झाल्यामुळे निवडणुकीला उभ्या होत्या त्यांच्यामागे राजकीय तसेच सामाजिक कार्याचा अजिबात अनुभव नव्हता,पण घराण्यातील इतर व्यक्तींनी केलेल्या कार्याचा किंवा लोकप्रियतेचा फायदा महिलांना झालेला दिसतो. तर जे १३ नगरसेवक २००५ च्या निवडणूकीपासून राजकीय अनुभव मिळाला असे म्हणतात. त्यांना याबाबत विचारले असता आम्ही समाजकार्य करीत होतो किंवा एका मंडळामुळे लोकांशी संपर्कात होतोच. पण कधी राजकारणात सक्रिय भाग घेतला नव्हता असे उत्तर देतात त्यांचे एकुण मुलाखत घेतलेल्या नगरसेवकांचे प्रमाण पाहता अनुक्रमे ३७.९५% व २७.३७% दिसते.

**प्रथम निवडणूक लढविलेले नगरसेवक .**

एकू ण १६ नगरसेवकांची व १८ नगरसेविकांनी आक्टोबर २००५ सालीच प्रथम निवडणूक लढविली आहे असे सागितले. राजेंद्र कसबेकर यांनी २००२ साली निवडणुक लढविली असे सांगितले, तर २००० साली निवडणुक लढविणाऱ्यामध्ये ६ नगरसेवक व एका नगरसेविकेचा समावेश होता. तर १९९० ला श्री. संजय पवार , श्री. नंदकुमार गजगेश्वर व श्रीमती संगिता काटकर यांनी निवडगूक लढविली होती. श्रीमती लता कदम यांनी १९८० ला प्रथम निवडणूक लढविली होती. तर सदाशिव बसुगडे यांनी १९७८ साली प्रथम नगर पालिकेची निवडणूक लढविली होती असे सांगितले.

**राजकारणात प्रवेश करावा असे केव्हा वाटले ?**

समाजसेवेची आवड होती म्हणून राजकारणात प्रवेश करावा असे म्हणणाऱ्यांमध्ये ११ नगरसेवकांचा व ४ नगरसेविकांचा समावेश अहे. ३ नगरसेविकांनी व ४ नगरसेवकांना जनतेने उभे केले म्हणून राजकारणात उतरलो अशी उत्तरे दिली. जितू सलगर यांच्या वार्डामध्ये बहुसंख्य मतदार मुस्लिम आहेत. त्याला मुस्लिम समाजाने पाठिंबा देऊन जबरदस्तीने उभे केले. १४ नगरसेविकांनी प्रभाग महिला आरक्षित झाल्यामुळे निवडणूक लढवायचे ठरविले असे सांगितले. तर राहिलेल्या ६ नगरसेविकांनी घरचा वारसा पुढे चालविण्यासाठी राजकारणात प्रवेश केल्याचे सांगितले.

६. विकास कामासाठी मिळणारा निधी पुरेसा आहे की नाही या बाबतचे कोष्टक

| विकास कामासाठी मिळणारे निधी | स्त्री व पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| पुरेसे आहेत | १ | ४ | ५ |
| | **२०.००%** | **८०.००%** | **१००.००%** |
| | *१.६४%* | *६.५६%* | *८.२०%* |
| | २.९४% | १४.८१% | ८.२०% |
| पुरेसे नाहीत | ३३ | २३ | ५६ |
| | **५८.९३%** | **४१.०७%** | **१००.००%** |
| | *५४.१०%* | *३७.७०%* | *९१.८०%* |
| | ९७.०६% | ८५.१९% | ९१.८०% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | **५५.७४%** | **४४.२६%** | **१००.००%** |
| एकूण टक्केवारी | *५५.७४%* | *४४.२६%* | *१००.००%* |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

विकास कामासाठी निधी पुरेसा आहेत. असे म्हणणाऱ्यामध्ये एका नगरसेवकाचा व ४ नगरसेविकांचा समावेश होतो. त्यांची मुलाखत घेतलेल्या नगरसेवकांशी प्रमाण पाहता १.६४% व ६.५६ % इतके दिसते

तर विकास कामासाठी मिळणारा निधी पुरेसा नाही असे म्हणणाऱ्यामध्ये ३३ नगरसेवक व २३ नगरसेविकांचा समावेश होतो. उपनगरातील नगरसेवकांचे सर्वसाधारणपणे एक समान तक्रार दिसून आली. ती म्हणजे मुख्य शहरातील रस्ते चांगले आहेत. पण नवीन निवडून आलेले नगरसेवक काही गरज नसताना चांगल्या स्थितीतील रस्ते उखरुन काढून परत रस्ते करतात. किंवा चांगल्या स्थितीतील रस्त्यावर डबल रस्ते करतात. त्याऐवजी तुलनेने उपनगरातील भागामध्ये विकासाची खूपशी कामे करायची आहेत. तेव्हा मुख्य शहरासाठी कमी विकास निधी देऊन उरलेल्या विकास निधी जर उपनगरातील

गावांना मिळाला तर उपनगरातील गावांचाही चांगला विकास करता येऊ शकेल पण असे न होता नगरसेवकांनी ठरवलेल्या रक्कमेइतका निधी दिल्या मुळे निवडणूक होवून अडीच वर्षे पूर्ण झाली तरी उपनगरातील कामे अजून पूर्ण झालेली दिसत नाहीत. याबाबत श्रीमती शुंभांगी पाटील या नगरसेविकेने सांगितलेली एक घटना नमूद करावीशी असे वाटते. सोमराज कॉम्प्लेकस या कोल्हापूरच्या उपनगर भागातील ड्रेनेज व्यवस्था चुकीची असल्यामुळे ड्रेनेजमधील मैला रस्त्यावर वाहून येतो. त्या मुळे त्या ये जा करणाऱ्या सामान्य लोकांना त्याचा त्रास होऊ लागला होता. नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना सांगूनही काही उपयोग होईना तेव्हा श्रीमती शुभांगी पाटील यांनी सदरचे काम स्वतः पैसे घालून ते पूर्ण करुन घेतले. या वरुन उपनगरातील समस्या सोडविण्याबाबत नगरसेविकांबरोबरच प्रशासकीय अधिकारी किती उदासीन असतात हे दिसून येते.

**विकास निधी पुरेसा ठरत नसेल तर विकास कामासाठी लागणारा पैसा कोठून उभारता ?**

या प्रश्नाच्या उत्तारादाखल श्रीमती शुभांगी पाटील यांनी आमच्या वार्डासाठी पाच पैसेही आमदार - खासदार फंडातून आले नसल्याचे सांगितले. तर बाकी सर्व नगरसेवकांनी शासकीय फंड व आमदार- खासदार निधीतून कामे केल्याचे सांगितले.

**शहराला भेडसावणाऱ्या ज्या समस्या आहेत त्या सोडवण्याबाबत तुम्ही किंवा तुमच्या पक्षाने कोणकोणती कामे केली ?**

या प्रश्नाच्या उत्तरादाखल प्रशासनाला समस्यांची जाणीव करुन दिली. असे म्हणणाऱ्यामध्ये ११ नगरसेवक तर ८ नगरसेविकांचा समावेश होतो. समस्या सोडवण्याचे प्रयत्न चालू आहेत असे म्हणणाऱ्यामध्ये ३ नगरसेवक व ४ नगरसेविकांचा समावेश होतो. आपल्या वार्डातील रस्ते, गटार व पाणी प्रश्न सोडविला आहे. असे म्हणणाऱ्यामध्ये १४ नगर सेवक व ६ नगरसेविकांचा समावेश होतो. श्रीमती लाटकर व श्रीमती शुभांगी पाटील यांच्या मते कोणतेही पद नाही, त्यामुळे फारशी विकास कामे होत नाहीत. जो निधी उपनगरासाठी शासनाकडून येतो .तो पुरेसा नसतो. कारण उपनगरामध्ये रस्ते, पाणी, लाईट, गटार या सुविधा पुरेशा प्रमाणात नाहीत त्यामुळे जास्त निधी उपनगराला मिळाला पाहिजे .

श्रीमती मृदुला पुरेकर यांनी ५ वर्षाच्या कालावधीमधील जवळजवळ २ वर्षे कामकाजाची माहिती करुन घेण्यात जातात. त्यामुळे राहिलेल्या ३ वर्षात विकास कामे पूर्ण करता येत नाहीत असे सांगितले.

श्री. आशीष ढवळे यांनी पाणी पुरवठ्यातील गळती या प्रश्नात जातीने लक्ष घालून त्याचा अभ्यास करुन महानगरपालिकेमध्ये ह्रा प्रश्न मांडला. त्यामुळे आयुक्तांनी त्यामध्ये लक्ष घातले असे सांगितले.

श्री. महेश सावंत यांनी स्थायी समिती मध्ये असताना फेरीवाले,अतिक्रमणे असे वेगवेगळे विषय स्थायी समितीमध्ये मांडले

श्री. रवी इंगवले हे स्थायी समितीचे सभासद असताना "ग्रीन लेक "ह्या नियोजनाला मंजूरी मिळाली. रंकाळा संवर्धनासाठी व सुशोभीकरणासाठी ८ ते ९ कोटींचा प्रस्ताव त्यांनी पाठवला होता. पंचगंगा घाट विस्तारीकरणासाठी व सुशोभीकरणासाठी ३५ लाख रु. मंजूर करुन घेतले. याशिवाय फिरंगाई मंदिर विस्तारीकरणासाठी १५ लाख रु. निधी मंजूर करुन घेतला. व रस्त्यावरील हायमास्ट लॅंप बसविले. श्री. रवी इंगवले यांच्या कारकीर्दीतच ही कामे झाली.

श्री. संभाजी जाधव यांनी स्थायी समिती सभापती म्हणून कचरा कामे, कचऱ्यापासून बायोगॅस, वारणा प्रकल्प अशी कामे केली आहेत.

मेधा नानिवडेकर यांच्या महिलांचा सत्तासहभाग, राखीव जागा धोरणाची फलश्रुती या अहवालात नागपूरच्या तत्कालीन महापौर डॉ. कुंदा विजयकर यांनी नगरसेविकांना वाढीव १ लाख रु. निधी देण्याची व्यवस्था केली होती. महिलांना त्यांच्या प्रभागातील कामे करण्यासाठी किंवा खासदार / आमदार निधी मिळवणे सहजी शक्य नसल्यामुळे हा निधी उपलब्ध करून देण्यात आला असे नमूद केले आहे. असे काही अभिनव निर्णय कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये घेतल्याचे आढळत नाही.

७. राजकारणातील प्रवेश कसा झाला या बाबतचे कोष्टक

| राजकारणातील प्रवेश | स्त्री व पुरुष | | एकूण |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | |
| अपघाताने | १७ | १४ | ३१ |
| | **५४.८४%** | **४५.१६%** | **१००.००%** |
| | *२७.८७%* | *२२.९५%* | *५०.८२%* |
| | ५०.००% | ५१.८५% | ५०.८२% |
| तयारीनिशी | १७ | १२ | २९ |
| | **५८.६२%** | **४१.३८%** | **१००.००%** |
| | *२७.८७%* | *१९.६७%* | *४७.५४%* |
| | ५०.००% | ४४.४४% | ४७.५४% |
| अन्य | | १ | १ |
| | **०.००%** | **१००.००%** | **१००.००%** |
| | *०.००%* | *१.६४%* | *१.६४%* |
| | ०.००% | ३.७०% | १.६४% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | **५५.७४%** | **४४.२६%** | **१००.००%** |
| एकूण टक्केवारी | *५५.७४%* | *४४.२६%* | *१००.००%* |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

आपला राजकारणातील प्रवेश हा अचानकपणे किंवा अपघातानेच झाला असे म्हणणाऱ्यामध्ये एकूण १७ नगसेवक व १४ नगरसेविका आहेत त्यांची मुलाखत घेतलेल्या नगसेविकांचे प्रमाण पाहता असे येते. २७.८७% व २२.९५ % इतके दिसते .

पूर्ण तयारी करुन राजकारण प्रवेश करणाऱ्यामध्ये १७ नगरसेवक व १२ नगरसेविकांचा समावेश होतो त्यांची मुलाखत घेतलेल्या नगरसेविकांचे प्रमाण पाहता २७.८७% व १९.६७ % इतके दिसते.

तर श्रीमती शुभांगी पाटील यांनी आपल्या पतीसाठी निवडणूक लढविण्याची तयारी झ्ाली होती पण अचानक प्रभाग महिला राखीव झाल्यामुळे मला संधी मिळाली असे सांगितले

राजकाराणातील प्रवेश अपघाताने झाला असे म्हणणाऱ्या स्त्रिया बहुधा घरचा वारसा पुढे चालवण्यासाठी किंवा प्रभाग महिला राखीव झाल्यामुळे निवडणुकीस उभ्या राहिल्या. जर त्यांचा मतदारसंघ महिला राखीव झाला नसता तर त्या स्त्रियांना राजकारणात प्रवेशाचा प्रश्नच नव्हता. पण पुरुषही राजकारणात अचानक प्रवेश झाला असे म्हणतात. ते थोडे विसंगत वाटले म्हणून त्यांना त्या मागील कारण विचारले असता त्यांनी वेगवेगळी कारणे सांगितली काहींनी आपल्या मतदारसंघात सामाजिक कार्य आधीपासून सुरु होते पण मित्रांनी किंवा त्या त्या भागातील मंडळांनी प्रोत्साहन दिल्यामुळे राजकारण प्रवेश केला असे सांगितले, तर काही नगरसेवतकांच्या बाबतीत अगोदर त्याच्याच भावकीतील दुसरे नातलग नगरसेवक होते भावकीतील तिढ्यामुळे विद्यमान नगसेवकांची कामे त्या माजी नगरसेवकांनी केले नाहीत म्हणून मग या विद्यमान नगरसेवकांनी निवडणूक लढविली असे सांगितले.

८.राजकारणातील प्रवेशाआधीचा सामाजिक कामाचा अनुभव या बाबतचे कोष्टक

| राजकारणातील प्रवेशाआधीचा सामाजिक कामाचा अनुभव | स्त्री व पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| हो, आहे | २२ | ५ | २६ |
| | **८४.६२%** | **१५.३८%** | **१००.००%** |
| | *३६.०७%* | *६.५६%* | *४२.६२%* |
| | ६४.७१% | १४.८१% | ४२.६२% |
| नाही | १२ | २२ | ३४ |
| | **३५.२९%** | **६४.७१%** | **१००.००%** |
| | *१९.६७%* | *३६.०७%* | *५५.७४%* |
| | ३५.२९% | ८१.४८% | ५५.७४% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | **५५.७४%** | **४४.२६%** | **१००.००%** |
| एकूण टक्केवारी | *५५.७४%* | *४४.२६%* | *१००.००%* |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

सर्वसाधारपणे समाजाकार्यात सहभागी असणारेच बहुतेक जण राजकारणातही थोड्याफार उशिराने का होईना सक्रिय होतात असे दिसते. राजकारणातील प्रवेशाआधी कामाचा अनुभव आहे असे म्हणणाऱ्यात २२ पुरुष व ५ स्त्रिया सदस्यांचा समावेश आहे. त्याची मुलाखत घेतलेल्या एकूण नगरसेवकापैकी प्रमाण पाहता ३६.०७ % व ६.५६ % इतके दिसते तर सामाजिक कामाचा अनुभव पाठीशी नसताना राजकारणामध्ये १२ नगरसेवकाचां व २२ नगरसेविकांचा समावेश होतो. त्यांची मुलाखत घेतल्ल्या एकूण नगरसेविकांशी प्रंमाण पाहता ते १९.६७ % व ३६.०७ % इतके आहे.

राजकारणामध्ये प्रवेश करण्यापूर्वी पुरुष नगरसेवक हे कोणत्या ना कोणत्या मंडळाशी जोडलेले असतात त्यांचे सामाजिक कार्य अशा एखाद्या मंडळामार्फत किंवा एखाद्या

तालीम वा पतसंस्थेमार्फत चालू असते. पण स्त्रिया मात्र बचतगटाशिवाय फक्त महिला मंडळाशी जोडलेल्या दिसून येतात यातही प्रत्यक्ष कामकाजात भाग घेऊन कार्यरत असणाऱ्या स्त्रिया खूपच कमी असतात. पण समाजकार्यामुळे लोकसंपर्क व अनुभव येत असल्यामुळे यांचा फायदा पुरुषांना राजकारण प्रवेशा वेळी होतो. त्यामुळे राजकारणातील प्रवेशाआधी सामाजिक कामाचा अनुभव असलेले बहुसंख्य नगरसेवक महापालिकेत दिसले. तर स्त्रियांची संख्या अगदीच अल्प आहे. राखीव जागा धोरणामुळे पुरेशा अनुभवाखेरीज ही प्रतिनिधित्वाची भूमिका बजावण्याची संधी स्त्रियांच्या वाट्याला आलेली आहेत. मात्र ही जबाबदारी पेलण्यासाठी लागणाऱ्या अनुभवांची त्यांच्याकडे असलेली उणीव भरून काढण्यासाठी त्यांना विशेष प्रशिक्षण देण्याची गरज आहे.

**राजकारणामध्ये प्रवेश करण्या अगोदरचे आपले जीवन व दिनचर्या यामध्ये काही फरक सांगता येईल का ?**

या प्रश्नाचे उत्तर देताना राजकारणात प्रवेश करण्याअगोदर कुटुंबासाठी भरपूर वेळ होता. पण सध्या कुटुंबासाठी वेळ मिळत नाही. आयुष्य खूप व्यस्त झाले आहे. लोकांच्यासाठी जास्त वेळ द्यावा लागतो, असे म्हणणाऱ्यामध्ये १८ नगरसेवक व २० नगरसेविकांचा समावेश आहे. तर घरामध्ये राजकारण खूप वर्षापासून चालू आहे. त्यामुळे आयुष्यात फारसा फरक जाणवत नाही. असे म्हणणाऱ्यामध्ये ३ नगरसेविका व ९ नगसेवकांचा समावेश होतो.

श्रीमती लता कदम यांच्यामते पूर्वी काही करता येत नव्हते म्हणून मन गुदमरत होते तर सध्या काही करायला वेळच मिळत नाही.

श्री. अनिल आवळे यांच्या मते पूर्वी नागरिकांच्या समस्या जास्त भेडसावत नव्हत्या सध्या नागरिकांच्या समस्या सोडविण्याकरता प्रयत्न करीत असतो.

श्री. प्रकाश मोहिते यांच्या मते राजकारणात आल्यामुळे समाज सेवेत वेळ जातो व मानसिक समाधान मिळते.

श्री. संभाजी जाधव व श्री. उमेश कांदेकर यांच्या मते, सध्या फारसे स्वातंत्र्य मिळत नाही. व जबाबदारी वाढली आहे.

श्री. अमोल माने यांच्यामते राजकारणाबद्दल उदात्त हेतू मनात होता पण तो हेतू पूर्ण झाला नाही.

**राजकारणात अनेक लोकांशी भेटताना काही अडचणी जाणवतात का ? कोणत्या प्रकारे ?**

या प्रश्नाच्या उत्तरादाखल बहूतेक सर्व नगरसेवकांनी काही अडचणी जाणवत नाहीत असे सांगितले. तर पाच नगरसेवकांनी लोकांच्या अपेक्षा खूप वाढल्या आहेत असे उत्तर दिले आहेत.

श्री. शारगंधर देशमुख यांनी हव्या त्या व्यक्ती वेळेवर भेटत नाहीत ही अडचण सांगितली तर बहूतेक नगरसेवकांनी काही नगरसेविकांनी काही अडचणी आल्या तर पतींची मदत होते असे सांगितले त्यामध्ये श्रीमती लता कदम, श्रीमती शुभांगी पाटील, श्रीमती माणिक पाटील यांनी आमची सर्व कामे आम्हीच पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. अगदीच नाइलाज झाला तर दुसऱ्यांची मदत घेतो असे सांगितले.

**राजकारणात आपणास घरच्यांचा पाठिंबा मिळतो का? मिळत नसेल तर कोणत्या अडचणीचा सामना करावा लागतो?**

या प्रश्नावर सर्व नगरसेवकांनी घरच्यांचा पाठिंबा मिळतो अशीच उत्तरे दिली आहेत.

९. राजकारणातील प्रवेशाआधीची दिनचर्या व नंतरची दिनचर्या या बाबतचे कोष्टक

| राजकारणातील प्रवेशाआधी व नंतरच्या दिनचर्येत फरक | स्त्री व पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| फरक पडला आहे | २६ | २३ | ४९ |
| | ५३.०६% | ४६.९४% | १००.००% |
| | ४२.६२% | ३७.७०% | ८०.३३% |
| | ७६.४७% | ८५.१९% | ८०.३३% |
| फरक पडला नाही | ८ | ४ | १२ |
| | ६६.६७% | ३३.३३% | १००.००% |
| | १३.११% | ६.५६% | १९.६७% |
| | २३.५३% | १४.८१% | १९.६७% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| एकूण टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

राजकारणातील प्रवेशाआधी दिनचर्या व राजकारणात प्रवेश केल्यानंतची दिनचर्या यामध्ये फरक पडला आहे असे म्हणणाऱ्यामध्ये २६ नगर सेवक व २३ नगरसेविकांचा समावेश होतो. त्यांची मुलाखत घेतलेल्या एकूण नगरसेविकांशी प्रमाण पाहता ते ७६.४७% व ८५.१९ % इतकी दिसते. तर राजकारणामध्ये प्रवेश करण्याअगोदरची दिनचर्या व राजकारणात प्रवेश केल्यानंतरची दिनचर्या यामध्ये काहीही फरक पडला नाही असे म्हणणाऱ्यामध्ये ८ नगरसेवक व ४ नगरसेविकांचा समावेश होतो. यांचे मुलाखत घेतलेल्या एकूण नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते १३.११ % व ६.५६ % इतके दिसते

सर्वसाधारणपणे जे लोक राजकारणातील प्रवेशाआधी समाजकार्य करीत होते किंवा ज्यांच्या घरी राजकारण या नगरसेवकांच्या राजकारण प्रवेशापूर्वी सुरु होते अशा घरातून व्यक्तीची त्यांच्या दिनचर्येत फारसा फरक पडणार नाही. पण ज्यांच्या घरी विद्यमान

नगरसेवकांच्या आधी घरातील दुसरे कोणी समाजकार्यात किंवा राजकारणात नसतील किंवा स्वतःही समाज कार्यात सक्रिय नसणाऱ्या नगरसेवकांच्या दिनचर्येत राजकारणातील प्रवेशानंतर निर्णायक फरक पडला असे म्हणता येईल.

१०. राजकीय सहभागासाठी शैक्षणिक पात्रतेची गरज या बाबतचे कोष्टक

| राजकीय सहभागासाठी शैक्षणिक पात्रता गरजेची वाटते का? | स्त्री व पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकुण |
| होय | ३४ | २६ | ६० |
| | **५६.६७%** | **४३.३३%** | **१००.००%** |
| | *५५.७४%* | *४२.६२%* | *९८.३६%* |
| | १००.००% | ९६.३०% | ९८.३६% |
| नाही | | १ | १ |
| | **०.००%** | **१००.००%** | **१००.००%** |
| | *०.००%* | *१.६४%* | *१.६४%* |
| | ०.००% | ३.७०% | १.६४% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | **५५.७४%** | **४४.२६%** | **१००.००%** |
| एकूण टक्केवारी | *५५.७४%* | *४४.२६%* | *१००.००%* |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

राजकीय सहभागासाठी शैक्षणिक पात्रता गरजेची वाटते का? या प्रश्नावर फक्त महापौर श्रीमती सई खराडे सोडून बाकी २६ नगरसेविकांनी शैक्षणिक पात्रता गरजेची आहे असे सांगितले यांचे मुलाखत घेतलेल्या एकूण ६१ नगरसेवकांशी प्रमाण पाहता ती अनुक्रमे ५५.७४ % व ४२.६२ % इतके येते .

श्रीमती सई खराडे यांनी मात्र शैक्षणिक पात्रतेपेक्षाही राजकीय अनुभव महत्वाचा आहे असे सांगितले वास्तविक. रोहिणी गवाणकर यांनी आपल्या मराठी स्त्रीशक्तीचे राजकारणीय रुप या पुस्तकामध्ये व नानिवडेकर यांनी आपल्या अहवालात राजकारणात शिक्षण महत्वाचे असल्याचे सांगितले. देशातील किंवा मतदारसंघातील लोकांच्या समस्या जाणून घेवून त्यांचा अभ्यास करुन योग्य त्या प्रशासकीय खात्यातील अधिकाऱ्याकडून



...ARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

लोकांची कामे करुन घेण्यासाठी शिक्षण खुपच महत्वाचे आहे. रोहिणी गवाणकर यांनी शिक्षण हे खूपच महत्वाचे असल्याचे म्हटले आहे. वक्तृत्व, जबाबदारपणा व चोफेर वाचन या गोष्टी राजकीय क्षेत्रात अर्थपूर्ण सहभागासाठी आवश्यक आहेत हे गुण नसलेल्या कार्यकर्त्या कष्टाळू असूनही मागे पडलेल्या दिसतात (२८६) असे म्हटले आहे.

## ११. मतदारसंघातील स्त्रियांसाठी केलेल्या कार्याबाबतचे कोष्टक

| मतदारसंघातील स्त्रियांसाठी केलेली कार्य | स्त्री व पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| होय | ३३ | २१ | ५४ |
| | ६१.११% | ३८.८९% | १००.००% |
| | ५४.१०% | ३४.४३% | ८८.५२% |
| | ९७.०६% | ७७.७८% | ८८.५२% |
| नाही | १ | ६ | ७ |
| | १४.२९% | ८५.७१% | १००.००% |
| | १.६४% | ९.८४% | ११.४८% |
| | २.९४% | २२.२२% | ११.४८% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| एकूण टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

मतदारसंघातील स्त्रियांसाठी काही कार्य केली आहे का ? या प्रश्नावर ३३ नगरसेवक व २१ नगरसेविका यांनी होय असे उत्तर दिले आहे. त्यांची एकूण मुलाखत घेतलेल्या नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते ५४.१०% व ३४.४३ % दिसते अधिक स्पष्टीकरण करताना कामे बचत गटामार्फत केलेली आहेत. तसेच महानगरपालिके मधील महिला व बालकल्याणतर्फे मिळालेल्या पिठाच्या चक्की व शिलाई मशीन गरजू महिलांना दिले असे सांगितले .

मतदारसंघातील स्त्रियांसाठी काही कार्य केले नाही असे म्हणणाऱ्यामध्ये श्री. राजेंद्र कसबेकर या एकमेव नगरसेवकांचा समावेश होतो. मुलाखत घेतलेल्या एकूण नगरसेवकाचे प्रमाण पाहता १.६४ % व ९.८४ % दिसते . यावरुन फक्त महिला बचत गट बालकल्याण विभागातर्फे महिलांसाठी कामे करता येतील असा या नगरसेवकाचा समज झाला आहे, अशी

शंका येते. याशिवाय महिलांच्या प्रगतीसाठी किंवा काम मिळवून देण्यासाठी किंवा त्यानी तयार केलेल्या वस्तुना महापालिकेच्या शाळांची व रुग्णालयांची बाजारपेठेत देऊन त्यांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी करता येते हे बहुसंख्य नगरसेवकांना माहिती नसल्याचे दिसते.त्यामुळे यासंबधीचे उद्‌बोधन व प्रशिक्षण देण्याचा उपयोग त्यांना राहील व स्त्रियांसाठी काही करयाची इच्छा आहे, पण काही करता येत नाही ही परिस्थिती बदलेल. स्त्रियामध्ये सध्या महिला व बालकल्याण समितीमार्फत सभापती श्रीमती लता कदम यांनी महिला व बालकल्याण मार्फत व वैयक्तिकरीत्या त्यांना काम मिळवून देण्यासाठी किंवा अर्थार्जनासाठी अनेक उपक्रम राबविले आहेत.

१२. महानगरालिका निवडणूक लढवण्याचे कारण याबाबतचे कोष्टक

| महानगरालीका निवडणूक लढवण्याचे कारण | स्त्री व पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| घरचा वारसा चालविण्यासाठी | ३ | ८ | ११ |
| | **२७.२७%** | **७२.७३%** | **१००.००%** |
| | *४.९२%* | *१३.११%* | *१८.०३%* |
| | ८.८२% | २९.६३% | १८.०३% |
| लोकाग्रहास्तव | ३ | | ३ |
| | **१००.००%** | **०.००%** | **१००.००%** |
| | *४.९२%* | *०.००%* | *४.९२%* |
| | ८.८२% | ०.००% | ४.९२% |
| स्वतःच्या इच्छेने | २८ | १९ | ४७ |
| | **५९.५७%** | **४०.४३%** | **१००.००%** |
| | *४५.९०%* | *३१.१५%* | *७७.०५%* |
| | ८२.३५% | ७०.३७% | ७७.०५% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | **५५.७४%** | **४४.२६%** | **१००.००%** |
| एकूण टक्केवारी | *५५.७४%* | *४४.२६%* | *१००.००%* |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

महानगरपालिकेची निवडणूक लढविण्याचे कारण कोणते, या प्रश्नावर घरचा वारसा पुढे चालविण्यासाठी महानगरपालिकेची निवडणूक लढविली. असे म्हणणाऱ्यामध्ये ३ पुरुष व ८ स्त्रियांचा समावेश होतो. यांचे मुलाखत घेतलेल्या एकूण नगरसेवकांचे प्रमाण पाहता ते ४.९२ % व १३.११ % दिसते .

तर लोकांच्या आग्रहास्तव महानगरपालिकेची निवडणूक लढविली असे म्हणणाऱ्यामध्ये ३ पुरुष सदस्यांचा समावेश होतो यामध्ये एकही स्त्री सदस्य नाही. एकूण

मुलाखत घेतलेल्या नगरसेवकाचे प्रमाण पाहता ते अनुक्रमे ४.९२ % तर स्वतःच्या इच्छेने निवडणूक लढविणाऱ्यामध्ये २८ नगरसेवकांचा व १९ नगरसेविकांचा समावेश होतो. त्यांचे एकूण मुलाखत घेतलेल्या नगरसेवकांचे प्रमाण पाहता ४५.९० % व ३१.१५ % इतके दिसते.

सध्याच्या विद्यमान नगरसेवकापैकी अर्ध्यापेक्षा जास्त नगरसेवकाचे वडील, काका, पती-पत्नी, असे कोणी ना कोणी नातलग महानगरपालिकेत यापूर्वी निवडून आले होते. त्यामुळे स्वतःच्या इच्छेने निवडणूक लढविली असे म्हणणाऱ्यामध्ये १९ स्त्रिया असल्या तरी बहुतेक स्त्री सदस्यांनी मतदारसंघ राखीव पडला म्हणून घरातील सत्ता बाहेर जाऊ नये म्हणून निवडणूक लढविली. तर श्री. नंदकुमार गजगेश्वर, श्री रवी इंगवले, श्री. संजय पवार, संभाजी देवणे, श्री. निलेश देसाई, अजित मोरे हे अगोदरही निवडून आले होते स्त्रियांमध्ये फक्त श्रीमती सई खराडे व श्रीमती मनीषा बुचडे या दोघीं अगोदरही निवडून आल्या होत्या. विद्यमान महापौर श्रीनती सई खराडे श्री. निलेश देसाई श्री. सागर चव्हाण श्रीमती सुषमा पवार यांच्या दोन तीन पिढ्या राजकारणात सक्रिय आहेत. याच्यांकडे राजकारणाचा वारसा परंपरेने चालत आला असे म्हणायला हरकत नाही.

विद्यमान सर्व नगरसेविका महिला आरक्षित मतदारसंघ मिळाल्यामुळेच राजकारणात उतरल्या आहेत. याला अपवाद फक्त श्रीमती तेजस्विनी घोरपडे यांचा आहे. श्रीमती तेजस्विनी घोरपडे या ओ.बी.सी.साठी खुल्या प्रवर्गाचे आरक्षण पडले असतानाही ३ पुरुष उमेदवाराविरुद्ध लढा देऊन विजयी झाल्या आहेत.

१३. निवडणूक लढविण्याची कौटूबिक परंपरा या बाबतचे कोष्टक

| आपल्या अगोदर घरातल्या किंवा नात्यातील व्यक्तींचा निवडणूकीत सहभाग | स्त्री व पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| होय | १३ | १८ | ३१ |
| | **४१.९४%** | **५८.०६%** | **१००.००%** |
| | *२१.३१%* | *२९.५१%* | *५०.८२%* |
| | ३८.२४% | ६६.६७% | ५०.८२% |
| नाही | २१ | ९ | ३० |
| | **७०.००%** | **३०.००%** | **१००.००%** |
| | *३४.४३%* | *१४.७५%* | *४९.१८%* |
| | ६१.७६% | ३३.३३% | ४९.१८% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | **५५.७४%** | **४४.२६%** | **१००.००%** |
| एकूण टक्केवारी | *५५.७४%* | *४४.२६%* | *१००.००%* |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

आपल्या अगोदर आपल्या घरातील किंवा नात्यातील दुसरे कोणी राजकारणात सक्रिय होते का? या प्रश्नावर १३ नगरसेवक व १८ नगरसेविकांनी होय असे उत्तर दिले आहेत. त्यांची मुलाखत घेतलेल्या एकूण नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते् अनुक्रमे २१.३१ टक्के व २९.५१ टक्के इतके आहे.

तर २१ नगरसेवक व ६ नगरसेविकांनी या पूर्वी आपल्या घरातील किंवा आपल्या नात्यातील दुसरे कोणीही निवडणूकीत सहभागी झाले नसल्याचे सांगितले. त्यांची मुलाखत

घेतलेल्या ६१ नगरसेवकांशी तुलना करता ते अनुक्रमे ३४.४३ टक्के व १४.७५ टक्के इतके दिसते.

सध्या सक्रिय विद्यमान नगरसेवकांपैकी श्री. सदाशिव बसुगडे, श्री. प्रकाश मोहिते, श्री. शेखर घोटणे यांच्या पत्नी पूर्वी नगरसेविका म्हणून निवडून आल्या होत्या तर श्रीमती शीला पंचिद्रें, श्रीमती मृदुला पुरेकर, श्रीमती सुषमा पोवार, श्रीमती मेहरुनबी पेटकर, श्रीमती लता कदम, श्रीमती सरिता मोरे, श्रीमती रुक्साना मुस्ताक मोमीन यांचे पती माजी नगरसेवक होते तसेच रवी इंगवले श्री. निलेश देसाई, श्री. सागर चव्हाण, श्रीमती सुषमा पोवार, श्रीमती सई खराडे यांच्या घरच्या दोन तीन पिढ्या राजकारणात सक्रिय आहेत. असे असूनही कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसतानाही **९** नगरसेवकांनी व २१ नगरसेविकांनी निवडणूक जिंकली आहे. यापैकी नगरसेवकांना असे राजकारणात सहभागी होणे फारसे कठीण गेले नसेल कारण बाहेर फिरण्यामुळे त्यांना राजकारणाचा अनुभव आलेला असतो. पण असा कोणताही अनुभव गाठीशी नसतानाही व घरातील इतर कोणी राजकारणात सक्रिय नसल्यामुळे इतर कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन न मिळताही राजकारणात सहभागी होऊन यशस्वी होऊन नगरसेविका हे पद मिळविण्याचे कठिण काम करण्यास **९** नगरसेविका यशस्वी झाल्याचे दुर्मिळ उदाहरण येथे पहावयास मिळते .

मेधा नानिवडेकर यांच्या महिलांचा सत्तेतील सहभाग या अहवालात पहिल्या निवडणूकीत पहिल्या ३ सदस्य कार्यकर्त्याही होत्या तर बाकींच्या पतींच्या वतीने महानगरपालिकेमध्ये सक्रिय होत्या असे पहावयास मिळते.२००५ च्या निवडणूकीत हे प्रमाण घटले असल्याचा भक्कम पुरावा माझ्या अभ्यासातुन मिळाला आहे.

त्यामुळे दिवसेदिवस कार्यकर्त्या स्त्रिया सदस्य म्हणून निवडून येण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. हे आरक्षण धोरणाची महत्वाची फलश्रुती म्हणावी लागेल.

१४. सध्या आपल्या घरातील राजकारणात सक्रिय व्यक्ती

| आपल्या घरातील राजकारणातील सक्रिय व्यक्ती | स्त्री व पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| होय | ६ | ३ | ९ |
| | **६६.६७%** | **३३.३३%** | **१००.००%** |
| | *९.८४%* | *४.९२%* | *१४.७५%* |
| | १७.६५% | ११.११% | १४.७५% |
| नाही | २८ | २४ | ५२ |
| | **५३.८५%** | **४६.१५%** | **१००.००%** |
| | *४५.९०%* | *३९.३४%* | *८५.२५%* |
| | ८२.३५% | ८८.८९% | ८५.२५% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | **५५.७४%** | **४४.२६%** | **१००.००%** |
| एकूण टक्केवारी | *५५.७४%* | *४४.२६%* | *१००.००%* |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

सध्या आपल्या घरातील दुसरी कोणी व्यक्ती राजकारणात सक्रिय आहे का? या प्रश्नावर ६ नगरसेवकांनी व ३ नगरसेविकांनी होय असे उत्तर दिले आहे. याचे मुलाखत घेतलेल्या नगरसेवकांचे प्रमाण पाहता ते अनुक्रमे १७.६५ टक्के व ११.११ टक्के इतके असल्याचे दिसते. तर २८ नगरसेवक व २४ नगरसेविकांनी दुसरी कोणीही व्यक्ती राजकारणात सध्या सक्रिय नसल्याचे सांगितले. यांचे एकूण मुलाखत घेतलेल्या व्यक्तीशी प्रमाण पाहता ते अनुक्रमे ८२.३५ टक्के व ८८.३४ टक्के इतके दिसते .येथे सध्या घरातील दुसरी व्यक्ती सक्रिय नसल्याचे प्रमाण लक्षणीय आहे.

१५. पक्षाचे तिकीट मिळविण्यासाठी कोणी प्रयत्न केले?

| पक्षाचे तिकीट कोणामुळे मिळाले | स्त्री व पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | पुरुष |
| अपक्ष | २९ | २२ | ५१ |
| | **५६.८६%** | **४३.१४%** | **१००.००%** |
| | *४७.५४%* | *३६.०७%* | *८३.६१%* |
| | ८५.२९% | ८१.४८% | ८३.६१% |
| नाही | | १ | १ |
| | **०.००%** | **१००.००%** | **१००.००%** |
| | *०.००%* | *१.६४%* | *१.६४%* |
| | ०.००% | ३.७०% | १.६४% |
| पत्नी | | ४ | ४ |
| | **०.००%** | **१००.००%** | **१००.००%** |
| | *०.००%* | *६.५६%* | *६.५६%* |
| | ०.००% | १४.८१% | ६.५६% |
| स्वतः | ५ | | ५ |
| | **१००.००%** | **०.००%** | **१००.००%** |
| | *८.२०%* | *०.००%* | *८.२०%* |
| | १४.७१% | ०.००% | ८.२०% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | **५५.७४%** | **४४.२६%** | **१००.००%** |
| एकूण टक्केवारी | *५५.७४%* | *४४.२६%* | *१००.००%* |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

पक्षाचे तिकीट मिळविण्यासाठी कोणी प्रयत्न केले या प्रश्नावर २९ नगरसेवक व २२ नगरसेविकांनी अपक्ष निवडणूक लढविली असल्याचे सांगितले यांची मुलाखत घेतलेल्या एकूण नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते अनुक्रमे ४७.५४ टक्के व ३६.०७ टक्के असे आहे.

फक्त एका नगरसेविकेने फारसे प्रयत्न करावे लागले नाहीत असे सांगितले. एकूण मुलाखत घेतलेल्या नगरसेवकांशी तुलना करता हे प्रमाण फक्त १.६४ टक्के इतके आहे पक्षाचे तिकीट मिळवण्यासाठी पतींनी प्रयत्न केले असे म्हणणाऱ्यामध्ये ४ नगरसेविकांचा समावेश होतो. तर पाच नगरसेवकांनी स्वतः प्रयत्न केल्याचे सांगितले.

सर्व साधारणपणे पक्षाचे तिकीट देताना त्या उमेदवाराचे शिक्षण , त्यांची मतदार संघातील लोकप्रियता , त्याची काम करण्याची पद्धत मतदारसंघामध्ये त्याने केलेले कार्य आणि त्या उमेदवाराची निवडूण येण्याची क्षमता व सर्वात महत्वाचे म्हणजे त्या उमेदवाराची निवडणूकीत खर्च करण्याची ऐपत व त्याचे राजकीय लागेबांधे यांचा विचार केला जातो. पण कोल्हापूर महानगपालिकेच्या आक्टोबर २००५ च्या निवडणूकीत फक्त राष्ट्रवादी व जनसुराज्य यांनी एकत्र येऊन उमेदवार उभे केले. तर शिवसेना व भाजपने युती करुन उमेदवार उभे केले. मात्र कॉंग्रेसने यावेळी पक्षातर्फे ही निवडणूक लढविली नाही. एका कार्यकर्त्याला तिकीट दिले तर दुसरा दुखावला जाईल या भीतीने कोणालाही कॉंग्रेसने पुरस्कृत केले नाही. तर जो उमेदवार आपल्या स्वबळावर निवडूण येईल तो आपला हा महाडिक पॅटर्न वापरण्यात आला त्यामुळे या निवडणूकीत अपक्ष उभे राहिलेल्या उमेदवारांची संख्या २२५ एवढी लक्षणीय होती . तर निवडून आलेल्या उमेदवारामध्ये ही ५१ लोक अपक्ष निवडून आले होते.

यावरुन कोल्हापूर महानगरपालिकेत राजकीय पक्ष पुरेसे प्रभावी ठरत नाहीत. तर आघाड्यांचे राजकारणच निर्णायक ठरते हेच सिद्ध होते.

**निवडणुकीची तयारी तुम्ही कशी केलीत ? यासाठी तुम्हाला दुसऱ्या कुणावर अवलंबून रहावे लागले का ?**

या प्रश्नाला उत्तर देताना १२ नगरसेवक व ७ नगरसेविकांनी स्वतः आपण निवडणुकीची तयारी केली असे सांगितले. तर मित्र परिवार, कार्यकर्ते व घरच्यांच्या

सहकार्याने निवडणुकीची तयारी केली. असे म्हणणाऱ्यामध्ये १६ नगरसेवक व १४ नगरसेविकांचा समावेश होतो.

श्रीमती देविका जरग व श्रीमती मनीषा लाटवडेकर यांनी प्रभागातील प्रौढांच्या मार्गदर्शनाखाली निवडणुकीची तयारी केली असे सांगितले.

श्री. सागर चव्हाण यांच्या मते त्यांचे वडील १५ वर्षे नगर सेवक असल्यामुळे लोक संपर्क चांगला होता. त्यामुळे त्यांना वेगळी तयारी करण्याची गरज नव्हती .

श्रीमती मेहरुनबी पटेकर यांच्या मते मी लोकाग्रहास्तव निवडणुक लढविली त्यामुळे वेगळी तयारी केली नाही. लोकांनीच निवडणुकीची तयारी करुन निवडून आणले.

श्रीमती सुषमा पवार याही राजकीय वारसा असलेल्या घरातून पुढे आल्या त्यामुळे लोकांचा जनसंपर्क होताच, तरी निवडणुकीपूर्वी एक-एक घर पाठीशी उभे केले आणि निवडून आले.

श्री. महेश सावंत व अजित मोरे यांनी सांगितले मागील निवडणुकीत अपयश आले होते त्यामुळे लोकांची सहानुभूती व सहकार्य चांगले मिळाले.

श्री. निलेश देसाई म्हणाले, प्रचार यंत्रणा चांगली राबविली.

**राजकीय पुरुषापेक्षा राजकीय महिलांना आपले कार्य करण्यामध्ये विविध अडचणींना सामोरे जावे लागते या बद्दल आपले मत काय .**

महिलांना आपले कार्य करताना अडचणी जाणवतात त्यांना कामाची पुरेशी जाणीव नसते. असे म्हणणाऱ्यामध्ये २१ नगरसेवक व ११ नगरसेविकांचा समावेश होतो.

श्री. आशीष ढवळे यांच्या मते महिला सक्रिय असतील तर फार मोठ्या प्रमाणात काम करू शकतात तर स्त्रियांना जास्त अडचणी जाणवत नाहीत पण त्यांना मर्यादा पडतात. असे म्हणणाऱ्यामध्ये ७ नगर सेवक व ९ नगरसेविकांचा समावेश होतो.

श्री. शारगंधर देशमुख यांच्या मते, रुढी-परंपरा, घरगुती अडचणी व महिलांकडे पाहण्याचा समाजाच्या दृष्टिकोन यामुळे त्यांना विविध अडचणींना सामोरे जावे लागते.

श्री. प्रकाश मोहिते म्हणतात की, महिलांना अडचणी जाणवतात याचे कारण अधिकारी वर्ग काम करत नाहीत. व महिला अधिक पुढाकार घेवू शकत नाहीत.

श्रीमती देविका जरग यांच्या मते महिलाच्या अडचणीचे कारण, सुस्तावलेले प्रशासन व अर्धवट मिळणारी माहिती हे आहे.

श्री. महेश सावंत म्हणतात, महिलांना जनरल वॉर्डामध्ये बोलता येत नाही मग नगर सेविकांचे पतीच कामे करण्यासाठी पुढे असतात तसेच अनुभव कमी असतो.

श्रीमती पुष्पा भालकर, श्रीमती मनिषा लाटवडेकर व श्रीमती मंगल ठोकळे यांच्या मते अडचणी जाणवतात त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करीत असतो.

**पुरुष नगरसेवकांना एक पुरुष म्हणून कोणते फायदे मिळतात ? किंवा तोटे होतात .**

स्त्री - पुरुष असा कोणताही भेदभाव न करता कोणाला एकालाच फायदा घेता येतो असे नाही. प्रत्येकाच्या कर्तृत्वावर अवलंबून असते. असे १० नगरसेवक व ६ नगरसेविकांचा समावेश होतो.

श्री. सदाशिव बसुगडे यांच्या मते पुरुष कोणत्याही ठिकाणी सरळ जाऊ शकतात, भेटू शकतात. मात्र स्त्रियांना कामे करून घेण्यासाठी मर्यादा पडतात.

श्री. नंदकुमार गजगेश्वर यांच्या मते पुरुष जसे चढाओढीने कामे करुन घेतात तसे स्त्रियांना करता येत नाही. श्रीमती पल्लवी मिठारी, श्रीमती मृदुला पुरेकर यांच्या मते पुरुष हे बाहेर अधिक फिरत असतात. त्याप्रमाणात त्यांना माणसे ओळखता येतात त्यामुळे त्यांना आमच्यापेक्षा माणसांच्या वर्तनाचे ज्ञान अधिक असते. या अनुभवांचा फायदा पुरुषांना होतो. श्रीमती मेहरुनबी पटेकर, श्रीमती शीला पचिंद्रे व श्रीमती सरिता मोरे यांच्या मते पुरुषांना जास्त संधी मिळते त्यांना महानगर पालिकेमध्ये कामाचा अनुभव जास्त असतो.

**महापालिकेमधील विविध महत्वाच्या समित्यावर स्त्रियांना कितपत संधी दिली जाते. त्यातही जास्त संधी राजकीय वारसा चालविणाऱ्या स्त्रियांना मिळते व मुळातच पक्ष कार्यकर्त्या असलेल्या स्त्रीला कमी संधी मिळते असा समज आहे.आपले या बद्दलचे मत काय ?**

या प्रश्नाच्या उत्तरादाखल असा भेद न करता दोघींनाही समान संधी मिळते असे म्हणणाऱ्यामध्ये २० नगर सेवकांचा तर १६ नगरसेविकांचा समावेश होतो. तर राजकीय वारसा चालविणाऱ्या स्त्रियांना मुळात पक्ष कार्यकर्ती असलेल्या स्त्रियांपेक्षा तुलनेत जास्त संधी मिळते असे म्हणणाऱ्यामध्ये ८ नगरसेवक व ४ नगरसेविकांचा समावेश होतो. तर श्री.

रवींद्र आवळे , श्री. महेश वासुदेव, श्रीमती लता कदम यांच्या मते संधी मिळणे हे कुशल नेतृत्व व स्वतःच्या कर्तृत्वावर अवलंबून असल्याचे सांगितले. श्रीमती मुस्ताना मोमीन यांनी कार्यकर्त्या स्त्रीला जास्त संधी मिळते असे सांगितले. श्री. उमेश कांदेकर यांनी बहुमत असलेल्या पक्षाच्या पक्षश्रेष्टीच्या मनाव्र सर्व अवलंबून असल्याचे सांगितले.

**सध्या नगरसेवक म्हणून निवडून आल्यामुळे भविष्यात अनेक संधी मिळू शकतील असे वाटते का ?**

या प्रश्नावर १४ नगरसेवकांनी व १० नगरसेविकांनी महापौर पद मिळेल असे सांगितले तर स्थायी समिती चेअरमन पद मिळेल अशी इच्छा १० नगरसेवक व ७ नगरसेविकांनी व्यक्त केली . काहींनी तसे नक्की सांगता येत नाही असे सांगितले. काही नगरसेवकांनी संधी मिळणार हे नक्की पण नेमकी कोणती हे सांगता येत नाहीतर ३ नगरसेवक व २ नगरसेविकांनी संधी अजिबात मिळणार नाही असे सांगितले श्रीमती देविका जरग यांनी करियर ऑप्शन नाही. त्यामुळे पुढे इंटरेस्ट नाही असे सांगितले.

फक्त एका नगरसेविकेने म्हणजे श्रीमती मेहरुनबी पटेकर व महापौर श्रीमती सई खराडे यांनी विधान सभेत जाण्याची संधी मिळेल असे सांगण्याचे धाडस केले तर नंदकुमार गजगेश्वर यांच्या मते कोणत्याही पक्षात नाही. त्यामुळे संधी कमी आहे. असे सांगितले

आतापर्यंत कोल्हापूर महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापतीपद एकाही स्त्रीला मिळालेले नाही या पार्श्वभूमीवर ७ नगरसेविकांनी स्थायी समिती सभापती पद मिळेल व २ नगरसेविकांनी आमदारकी मिळेल असे सांगणे हा नव्याने निर्माण झालेला त्यांचा आत्मविश्वास आहे की, त्यांना वास्तवाचे पुरेसे भान नाही असा प्रश्न निर्माण करतो. विविध समिती मधील स्त्री-पुरुष प्रतिनिधींचे प्रमाण पुढील प्रमाणे-

## १६. स्थायी समिती

| वर्ष | स्त्री-पुरूष | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सभापती | सभापती | सदस्य | | सदस्य | एकूण |
| | पुरूष | एकूण | पुरूष | स्त्री | एकूण | |
| २००५-२००६ | १ | १ | ८ | ७ | १५ | १६ |
| | ३३.३३% | ३३.३३% | २५.८१% | ५०.००% | ३३.३३% | ३३.३३% |
| | २.०८% | २.०८% | १६.६७% | १४.५८% | ३१.२५% | ३३.३३% |
| २००६-२००७ | १ | १ | ११ | ४ | १५ | १६ |
| | ३३.३३% | ३३.३३% | ३५.४८% | २८.५७% | ३३.३३% | ३३.३३% |
| | २.०८% | २.०८% | २२.९२% | ८.३३% | ३१.२५% | ३३.३३% |
| २००७-२००८ | १ | १ | १२ | ३ | १५ | १६ |
| | ३३.३३% | ३३.३३% | ३८.७१% | २१.४३% | ३३.३३% | ३३.३३% |
| | २.०८% | २.०८% | २५.००% | ६.२५% | ३१.२५% | ३३.३३% |
| एकूण | ३ | ३ | ३१ | १४ | ४५ | ४८ |
| एकूण टक्केवारी | ६.२५% | ६.२५% | ६४.५८% | २९.१७% | ९३.७५% | १००.००% |
| उभ्या रकाण्याची एकूण टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% | १००.००% | १००.००% | १००.००% |

महानगरपालिकेचे प्रत्यक्ष कामकाज अनेक समित्याद्वारे चालते या समित्यामध्ये स्थायी समिती महत्वाची असते. स्थायी समितीमध्ये २००५-२००६ मध्ये १६ सदस्य होते. यापैकी ८ पुरूष व ७ स्त्रिया होत्या. यांचे एकूण सदस्यांशी प्रमाण पहाता ते अनुक्रमे ५०% व ४८.४०% इतके दिसते. यावर्षी सभापतीपदी आरूढ होणारी व्यक्ती ही पुरूषच होती.

२००६-२००७ मधील एकूण १६ सदस्यात सभापतीसह एकूण १२ पुरूष सदस्य होते तर फक्त ४ स्त्रियांना सदस्यत्व देण्यात आले होते.

२००७-२००८ मधील एकूण १६ सदस्यात सभापतीसह एकूण १३ पुरूष सदस्य होते. तर फक्त ३ स्त्रियांना संधी देण्यात आली होती.

यावरून स्थायीसारख्या महत्वाच्या समितीवर स्त्रियांना फार कमी प्रतिनिधित्व मिळते असे दिसून येते. तरी या तीन वर्षामध्ये एकाही वर्षी स्त्रीला सभापतीचे पद दिलेले नाही. या तिन्ही वर्षातील एकूण ४८ सदस्यामध्ये स्त्रियांची संख्या १४ इतकी असून पुरूषांची संख्या सभापतीसह ३४ इतकी असल्याचे दिसते. स्थायीसारख्या महत्वाच्या समितीवर ३३% जागा ही स्त्रियांना मिळत नाहीत हेच यावरून दिसून येते. त्यामुळे स्थायी समिती सभापतीपद मिळणे ही तर स्त्रियांच्या दृष्टीने अगदी स्वप्नवत गोष्ट ठरू शकते असे खेदाने म्हणावे लागेल. १९९० पासून आजपर्यंत एकाही स्त्रीला स्थायी समितीचे सभापतीपद मिळालेले नाही हे लक्षणीय आहे.

## १७ परिवहन समिती

| वर्ष | स्त्री-पुरूष | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | सभापती | | सभापती | सदस्य | | सदस्य | एकूण |
| | पुरूष | स्त्री | एकूग | पुरूष | स्त्री | एकूण | |
| २००५-२००६ | १ | | १ | ११ | १ | १२ | १३ |
| | ५०.००% | ०.००% | ३३.३३% | ३४.३८% | २५.००% | ३३.३३% | ३३.३३% |
| | २.५६% | ०.००% | २.५६% | २८.२१% | २.५६% | ३०.७७% | ३३.३३% |
| २००६-२००७ | १ | | १ | १० | २ | १२ | १३ |
| | ५०.००% | ०.००% | ३३.३३% | ३१.२५% | ५०.००% | ३३.३३% | ३३.३३% |
| | २.५६% | ०.००% | २.५६% | २५.६४% | ५.१३% | ३०.७७% | ३३.३३% |
| २००७-२००८ | | १ | १ | ११ | १ | १२ | १३ |
| | ०.००% | १००.००% | ३३.३३% | ३४.३८% | २५.००% | ३३.३३% | ३३.३३% |
| | ०.००% | २.५६% | २.५६% | २८.२१% | २.५६% | ३०.७७% | ३३.३३% |
| एकूण | २ | १ | ३ | ३२ | ४ | ३६ | ३९ |
| एकूण टक्केवारी | ५.१३% | २.५६% | ७.६९% | ८२.०५% | १०.२६% | ९२.३१% | १००.००% |
| उभ्या रकाण्याची एकूण टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% | १००.००% | १००.०० % | १००.००% | १००.००% |

परिवहन समितीमध्ये २००५-२००६ या वर्षी एकूण १३ सभासद होते. यामध्ये सभापतींसह १२ पुरूष व १ स्त्री सदस्यांचा समावेश होतो. २००६-२००७ मध्ये परिवहन समितीवर संधी मिळालेल्या १३ सदस्यांमध्ये सभापतींसह ११ पुरूष सदस्य व २ स्त्री सदस्यांचा समावेश होतो. तर २००७-२००८ मध्ये परिवहन समितीवर संधी मिळालेल्या एकूण १३ सदस्यांमध्ये ११ पुरूष सदस्यांचा व सभापतींसह २ स्त्री सदस्यांचा समावेश होतो.

परिवहन समितीवर ही गेल्या तिन्ही वर्षात स्त्रियांना अगदीच कमी प्रतिनिधित्व मिळाल्याचे दिसते. यावरून जरी स्त्रियांना उमेदवारी मिळून त्या निवडून आल्या तरी प्रत्यक्ष काम करण्याच्या संधी त्यांना कितपत उपलब्ध करून दिल्या जातील याबद्दल शंका निर्माण होते. म्हणजे २००५-२००६, २००६-२००७, २००७-२००८ या तिन्ही वर्षामध्ये एकूण ३९ सदस्यांमध्ये केवळ ४ स्त्रियांना प्रतिनिधित्व मिळाले होते तर पुरूषांची संख्या सभापतीसह एकूण ३५ इतकी होती यावरून स्त्रियांना निर्णयक्षम संस्थांमध्ये सहभागी होण्याची संधी कमी मिळते हे दिसून येते.

## १८.महिला व बालकल्याण समिती

| वर्ष | स्त्रीपद | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | सभापती स्त्री | सभापती एकूण | सदस्य स्त्री | सदस्य एकूण | एकूण |
| २००५-२००६ | १ | १ | ८ | ८ | ९ |
| | ३३.३३% | ३३.३३% | ३३.३३% | ३३.३३% | ३३.३३% |
| | ३.७०% | ३.७०% | २९.६३% | २९.६३% | ३३.३३% |
| २००६-२००७ | १ | १ | ८ | ८ | ९ |
| | ३३.३३% | ३३.३३% | ३३.३३% | ३३.३३% | ३३.३३% |
| | ३.७०% | ३.७०% | २९.६३% | २९.६३% | ३३.३३% |
| २००७-२००८ | १ | १ | ८ | ८ | ९ |
| | ३३.३३% | ३३.३३% | ३३.३३% | ३३.३३% | ३३.३३% |
| | ३.७०% | ३.७०% | २९.६३% | २९.६३% | ३३.३३% |
| एकूण | ३ | ३ | २४ | २४ | २७ |
| एकूण टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% | १००.००% | १००.००% |
| उभ्या रकाण्याची | | | | | |
| एकूण टक्केवारी | ११.११% | ११.११% | ८८.८९% | ८८.८९% | १००.००% |

महिला व बालकल्याण समितीमध्ये गेल्या तिन्ही वर्षी सर्वच्या सर्व सदस्य स्त्रियाच असल्याचे दिसते. म्हणजे २५% जागा खुल्या असूनही एकही पुरूष या समितीवर येण्यास उत्सूक नसल्याचे दिसते. या बद्दल नगरसेवकांना विचारले असता, जास्तीत जास्त महिलांना संधी मिळावी म्हणून कोणी नगरसेवकांनी या समितीमध्ये प्रतिनिधित्व घेतले नसल्याचे सांगितले. तरी प्रत्यक्ष परिस्थिती मात्र वेगळीच दिसते. महिला सभापतीच्या अधिपत्याखाली, महिलांशी संबंधित समितीमध्ये काम करणे कदाचित पुरूषांना कमीपणाचे वाटत असावे अशी शंका येते. अथवा ही समिती महत्वाची वाटत नसावी.

## १९. प्राथमिक शिक्षण मंडळ

| वर्ष | स्त्री -पुरूष | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सभापती स्त्री | सभापती एकूण | सदस्य पुरूष | सदस्य स्त्री | सदस्य एकूण | एकूण |
| २००६-२००७ | १ | १ | ५ | ६ | ११ | १२ |
| | ५०.००% | ५०.००% | ५०.००% | ५०.००% | ५०.००% | ५०.००% |
| | ४.१७% | ४.१७% | २०.८३% | २५.००% | ४५.८३% | ५०.००% |
| २००७-२००८ | १ | १ | ५ | ६ | ११ | १२ |
| | ५०.००% | ५०.००% | ५०.००% | ५०.००% | ५०.००% | ५०.००% |
| | ४.१७% | ४.१७% | २०.८३% | २५.००% | ४५.८३% | ५०.००% |
| एकूण | २ | २ | १० | १२ | २२ | २४ |
| एकूण टक्केवारी उभ्या रकाण्याची | १००.००% | १००.००% | १००.००% | १००.००% | १००.००% | १००.००% |
| एकूण टक्केवारी | ८.३३% | ८.३३% | ४१.६७% | ५०.००% | ९१.६७% | १००.००% |

२००६-२००७ या वर्षी प्राथमिक शिक्षण मंडळावर एकूण १२ सदस्य आहेत. सभापतीसह ६ पुरूषांचा व ६ स्त्रियांचा समावेश होतो. २००७-२००८ मध्ये एकूण १२ सदस्यांपैकी सभापतीसह एकूण ६ पुरूष नगरसेवक व ६ स्त्री नगरसेविकांचा समावेश होतो. या समितीमध्ये दोन्ही वर्षी स्त्रियांना संधी मिळाली. आहे. या दोन्ही वर्षी प्राथमिक शिक्षण सभापतीपद स्त्रियांना मिळाले आहे. हे आशाजनक चित्र आहे.

## २०.महानगरपालिकेतील महत्त्वाच्या समितीमध्ये स्त्री-पुरुषांचा सहभाग२००५-२००६

| समितीचे नाव | स्त्री-पुरुष | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | सभापती | | एकूण | सदस्य | | एकूण | एकूण |
| | पुरुष | स्त्री | सभापती | पुरुष | स्त्री | सदस्य | |
| महिला व | | १ | १ | | ८ | ८ | ९ |
| बालकल्याण समिती | **०.००%** | **२.६३%** | **२.६३%** | **०.००%** | **२१.०५%** | **२१.०५%** | **२३.६८%** |
| | ०.००% | १००.००% | ३३.३३% | ०.००% | ५०.००% | २२.८६% | २३.६८% |
| परिवहन | १ | | १ | ११ | १ | १२ | १३ |
| समिती | **२.६३%** | **०.००%** | **२.६३%** | **२८.९५%** | **२.६३%** | **३१.५८%** | **३४.२१%** |
| | ५०.००% | ०.००% | ३३.३३% | ५७.८९% | ६.२५% | ३४.२९% | ३४.२१% |
| स्थायी समिती | १ | | १ | ८ | ७ | १५ | १६ |
| | **२.६३%** | **०.००%** | **२.६३%** | **२१.०५%** | **१८.४२%** | **३९.४७%** | **४२.११%** |
| | ५०.००% | ०.००% | ३३.३३% | ४२.११% | ४३.७५% | ४२.८६% | ४२.११% |
| एकूण | २ | १ | ३ | १९ | १६ | ३५ | ३८ |
| एकूण टक्केवारी | **५.२६%** | **२.६३%** | **७.८९%** | **५०.००%** | **४२.११%** | **९२.११%** | **१००.००%** |
| उभ्या रकाण्याची एकूण टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% | १००.००% | १००.००% | १००.००% | १००.००% |

महानरपालिकेतील महत्वाच्या समितीमधील स्त्री- पुरुषांचा सहभाग पहाता महिला व बालकल्याण समिती सोडून बाकी कोणत्याही समितीवर स्त्रियांना सभापती पदाची संधी मिळालेली दिसत नाही. परिवहन व स्थायी समितीमधील सभापती पदासाठी यावर्षी पुरूषांचीच वर्णी लागलेली दिसते.

**२१. महानगरपालिकेतील महत्त्वाच्या समितीमध्ये स्त्री-पुरुषांचा सहभाग २००६-२००७**

| समितीचे नाव | स्त्री-पुरुष | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | सभापती | | एकूण | सदस्य | | एकूण | एकूण |
| | पुरुष | स्त्री | सभापती | पुरुष | स्त्री | सदस्य | |
| महिलाव बालकल्याण समिती | | १ | १ | | ८ | ८ | ९ |
| | ***०.००%*** | ***२.००%*** | ***२.००%*** | ***०.००%*** | ***१६.००%*** | ***१६.००%*** | ***१८.००%*** |
| | ०.००% | ५०.००% | २५.००% | ०.००% | ४०.००% | १७.३९% | १८.००% |
| प्राथमिक शिक्षण मंडळ | | १ | १ | ५ | ६ | ११ | १२ |
| | ***०.००%*** | ***२.००%*** | ***२.००%*** | ***१०.००%*** | ***१२.००%*** | ***२२.००%*** | ***२४.००%*** |
| | ०.००% | ५०.००% | २५.००% | १९.२३% | ३०.००% | २३.९१% | २४.००% |
| परिवहन समिती | १ | | १ | १० | २ | १२ | १३ |
| | ***२.००%*** | ***०.००%*** | ***२.००%*** | ***२०.००%*** | ***४.००%*** | ***२४.००%*** | ***२६.००%*** |
| | ५०.००% | ०.००% | २५.००% | ३८.४६% | १०.००% | २६.०९% | २६.००% |
| स्थायी समिती | १ | | १ | ११ | ४ | १५ | १६ |
| | ***२.००%*** | ***०.००%*** | ***२.००%*** | ***२२.००%*** | ***८.००%*** | ***३०.००%*** | ***३२.००%*** |
| | ५०.००% | ०.००% | २५.००% | ४२.३१% | २०.००% | ३२.६१% | ३२.००% |
| एकूण | २ | २ | ४ | २६ | २० | ४६ | ५० |
| एकूण टक्केवारी | ***४.००%*** | ***४.००%*** | ***८.००%*** | ***५२.००%*** | ***४०.००%*** | ***९२.००%*** | ***१००.००*** |
| उभ्या रकाण्याची एकूण टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% | १००.००% | १००.००% | १००.००% | १००.०० |

२००६ व २००७ मध्ये महिला व बालकल्याण समितीवर व प्राथमिक शिक्षण मंडळावर नगरसेविका कार्यरत होत्या. तर परिवहन समिती व स्थायी समितीच्या सभापती पदावर पुरूषांचेच वर्चस्व दिसून येते. या चार समितींमधील एकूण ५० सदस्यांमध्ये २००६-२००७ या वर्षी २ सभापतींसह २२ स्त्रिया व २ सभापतीसह २८ पुरुष सदस्य कार्यरत असलेले दिसतात. मात्र यातील ३ स्त्रिया महिला बालकल्याण समितीवर आहेत.

## २२. महानगरपालिकेतील महत्त्वाच्या समितीमध्ये स्त्री-पुरुषांचा सहभाग २००७-२००८

| समितीचे नाव | स्त्री-पुरुष | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | सभापती | | एकूण | सदस्य | | एकूण | एकूण |
| | पुरुष | स्त्री | सभापती | पुरुष | स्त्री | सदस्य | |
| महिलाव | | १ | १ | | ८ | ८ | ९ |
| बालकल्याण | ०.००% | २.००% | २.००% | ०.००% | १६.००% | १६.००% | १८.००% |
| समिती | ०.००% | ३३.३३% | २५.००% | ०.००% | ४४.४४% | १७.३९% | १८.००% |
| प्राथमिक शिक्षण | | १ | १ | ५ | ६ | ११ | १२ |
| मंडळ | ०.००% | २.००% | २.००% | १०.००% | १२.००% | २२.००% | २४.००% |
| | ०.००% | ३३.३३% | २५.००% | १७.८६% | ३३.३३% | २३.९१% | २४.००% |
| परिवहन समिती | | १ | १ | ११ | १ | १२ | १३ |
| | ०.००% | २.००% | २.००% | २२.००% | २.००% | २४.००% | २६.००% |
| | ०.००% | ३३.३३% | २५.००% | ३९.२९% | ५.५६% | २६.०९% | २६.००% |
| स्थायी समिती | १ | | १ | १२ | ३ | १५ | १६ |
| | २.००% | ०.००% | २.००% | २४.००% | ६.००% | ३०.००% | ३२.००% |
| | १००.००% | ०.००% | २५.००% | ४२.८६% | १६.६७% | ३२.६१% | ३२.००% |
| एकूण | १ | ३ | ४ | २८ | १८ | ४६ | ५० |
| एकूण टक्केवारी | २.००% | ६.००% | ८.००% | ५६.००% | ३६.००% | ९२.००% | १००.००% |
| उभ्या रकाण्याची एकूण टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% | १००.००% | १००.००% | १००.००% | १००.००% |

२००६-२००८ या वर्षी एकूण ४ समित्यांपैकी स्थायी समिती सोडून बाकी तिन्ही समित्यांवर स्त्रियांना संधी मिळाल्याचे दिसते. एकूण ५० सदस्यामध्ये २१ स्त्रिया व २९ पुरुषांची निवड झाल्याचे दिसते.

या वर्षीचा सभापती व सदस्यांचा आलेख पाहता एकूण चित्र स्त्रियांना अनुकूल असल्याचे दिसते.

## स्त्रियांसाठीचे प्रश्न

सदर अभ्यासात कांही प्रश्न केवळ स्त्री सदस्यांना विचारण्यात आले. त्यास मिळालेल्या प्रतिसादातून आढळलेल्या गोष्टी पुढील प्रमाणे-

**एक स्त्री म्हणून पहिल्यांदा राजकारणात उतरण्याचा जो निर्णय घेतला त्याच्या घरात काय प्रतिक्रिया मिळाल्या ?**

एक स्त्री म्हणून पहिल्यांदा राजकारणात उतरण्याचा जो निर्णय घेतला, त्यांची घरात काय प्रतिक्रिया मिळाली या प्रश्नावर सर्व नगरसेविकांनी घरी पाठिंबा मिळाला असे उत्तर दिले आहे.

खरेतर यापैकी बहुतेक जणांनी लग्नांनंतरच राजकारणात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. निर्णय घेतला असे म्हणण्यापेक्षा घरच्या लोकांनीच यांना निवडणुकीसाठी उभे केले असे म्हणावे लागेल , 3 नगरसेविका लग्नाअगोदरपासून राजकारणात सक्रिय होत्या असे सांगतात पण लग्नाअगोदरपासून त्या कोणत्याही सामाजिक किंवा राजकीय संस्थेत कार्यरत नव्हत्या. म्हणजे त्यांचा राजकारणातील रस फक्त निवडणुकीपुरताच होता असे म्हणता येईल. लग्नानंतरही प्रभाग महिला राखीव होईपर्यंत यांनी प्रत्यक्ष राजकारणात कधीच भाग घेतला नव्हता या सर्व नगरसेविकांचे राजकीय निर्णय व त्यांचे पतीच घेतात. त्यामुळे यांचा राजकारणात उतरण्याचा निर्णय स्वतःचा नसून त्या प्रभागातील सत्ता कुंटुंबासाठी राखण्याचे हे सोयीचे राजकारण वाटते.

**स्त्री म्हणून निवडणूकीचे तिकीट मिळवताना पुरुषांच्या तुलनेने जास्त कठीण गेले की सोपे ?**

स्त्री म्हणून निवडणुकीचे तिकीट मिळविताना पुरुषांच्या तुलनेत जास्त सोपे गेले असे म्हणणाऱ्यांमध्ये 3 नगरसेविकांचा समावेश होतो. तर एका नगरसेविकेने असे तिकीट मिळविणे कठीण गेले असे सांगितले. तर उरलेल्या 23 जणींनी ही निवडणूक अपक्ष लढविली होती.

जरी 23 जणींनी ही निवडणूक अपक्ष लढविली होती. पण वेळप्रसंगी त्यांनी नंतर फायदेशीर सौदा करत वेगवेगळ्या आघाड्यांमध्ये प्रवेश केल्याचे दिसले. तिकीट मिळविणे सोपे गेले असे म्हणणाऱ्या नगरसेविकांनी राखीव मतदार संघ झाल्यामुळे राजकीय प्रवेश केला आहे. त्यामुळे धोरणाचा फायदा तिला तिकीट मिळवताना झाला. तर उरलेल्यांना

तिकीट मिळविणे कठीण गेले म्हणणाऱ्या नगरसेविकांच्या मागे कोणतीच राजकीय पार्श्वभूमी नव्हती हेही कारण असू शकेल.

**निवडणूक प्रचारादरम्यान तुम्ही स्त्री असल्यामुळे निवडणुकीला उभे राहताय म्हणून लोकांकडून कशा प्रकारच्या प्रतिक्रिया मिळाल्या ?**

निवडणूक प्रचारादरम्यान तुम्ही स्त्री असूनही निवडणुकीला उभे राहता म्हणून लोकांकडून तुम्हाला कशा प्रकारच्या प्रतिक्रिया मिळाल्या यावर सर्वच नगरसेविकांनी प्रतिक्रिया कौतुकाच्या मिळाल्या असे उत्तर दिले आहे..यावरुन स्त्रियांचा सार्वजनिक जीवनातील सहभाग स्वीकारण्यास समाजमन तयार झाले आहे हे दिसून येते.

**२३. नगरसेविका म्हणून करावयाची कामे व एका गृहिणीची कामे हा समतोल तुम्ही कसा सांभाळता ?**

| | एकूण |
|---|---|
| अडीच वर्षे सांभाळता आला नाही | १<br>३.७० % |
| नियोजन करून समतोल सांभाळला | २५<br>९२.५९% |
| थोडा त्रास जाणवतो पण ठीक आहे. | १<br>३.७०% |
| एकूण | २७ |
| एकूण टक्केवारी | १०० % |

नगरसेविका म्हणून करावयाची कामे व एका गृहिणीची कामे यांचा समतोल तुम्ही कसा सांभाळता यावर महापौर श्रीमती सई खराडे यांनी महापौर असल्यामुळे महापालिकेमध्ये जास्त वेळ जात होता त्यामुळे गेली अडीच वर्षे हा समतोल सांभाळता आला नाही, असे उत्तर दिले तर 25 नगरसेविकांनी वेळेचे नियोजन करुन समतोल सांभाळता आला असे उत्तर दिले, अजून एका नगरसेविकेने दोन्ही जबाबदाऱ्या पार पाडताना थोडा

त्रास जाणवतो पण एवढे मोठे पद भूषवायच तर हे सहन करायलाच पाहिजे असे उत्तर दिले.

नगरसेविका झाली म्हणून स्त्रियांच्या मागे असलेली कामे किंवा संसाराची जबाबदारी कमी होत नाही. ती जबाबदारी पार पाडूनच त्यांना नगरसेवक म्हणून असलेली कामे करावी लागतात. यावेळी कधी कधी त्या पतीचे सहकार्य घेवून या दोन्ही जबाबदाऱ्या त्या पार पाडताना दिसतात.

यावरुन घरातले काम हे घरातील सर्वाचें ही जाणीव आजही सर्वसामान्य स्त्री पुरुषांच्या मनात रुजलेली नाही हेच स्पष्ट होते.

**24. आजपर्यंत अनुभवावरुन स्त्री सदस्यांची कामे त्यांचे पुरुष नातलगच सांभाळतात याबाबत आपले मत काय ?**

| | एकूण |
|---|---|
| सर्व कामे माझी मीच करते | १<br>३.७०% |
| पतींच्या सहकार्याने मी सांभाळते | २५<br>९२.५९% |
| पतींनी कधी ढवळाढवळ केली नाही | १<br>३.७०% |
| एकूण | २७ |
| एकूण टक्केवारी | १००% |

आजपर्यंतच्या अनुभवावरुन स्त्री नगरसेवकांची सर्व कामे त्यांचे पुरुष नातलग सांभाळतात याबाबत आपले मत काय या प्रश्नावर पतींच्या सहकार्याने मीच सांभाळते असे म्हणणाऱ्यामध्ये 25 नगरसेविकांचा समावेश होतो. तर महानगरपालिकेतील व इतर कामे माझी मीच करते असे म्हणणाऱ्यामध्ये फक्त 1 नगरसेविकेचा समावेश होता. तर श्रीमती सई खराडे यांनी पतींनी कधीही कामात ढवळाढवळ केली नाही असे सांगितले.

ज्या 25 स्त्रियांनी पतींच्या सहकार्याने मी कामे सांभाळते असे सांगितले त्यांचे विश्लेषण करताना महानगरपालिकामधील कामे, मिटिंग्ज मी बघते तर प्रभागातील कामे पती बघतात असे सांगितले मात्र या सर्व नगरसेविकांनी आम्ही प्रभागातून 1/2 दिवसाआड फिरतो असे मात्र न चुकता सांगितले कारण लोकांच्या समस्या जाणून घेवून ते महानगरपालिका सभेत मांडणे महत्वाचे असल्याने लोकांशी संपर्क साधणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

**खुल्या जागामधून निवडून आलात की आरक्षित जागांवरुन ?**

मनपामधील 27 नगरसेविकांपैकी 26 नगरसेविका या महिलांच्यासाठी राखीव मतदारसंघातून निवडून आल्या आहेत. फक्त श्रीमती तेजस्विनी घोरपडे या ओ.बी.सी. सर्वसाधारण मतदार संघातून निवडून आल्या आहेत.

यामागील कोल्हापूर मनपाच्या निवडणूकीवर दृष्टिक्षेप टाकला तर 1978 व 1985 साली झालेल्या निवडणुकीत एकही महिला सदस्या निवडून आली नव्हती. कारण या दोन्ही वर्षी महिलांसाठी राखीव मतदारसंघ नव्हते. 1990 मध्ये जेव्हा महाराष्ट्र शासनाने स्त्रियांना स्थानिक स्थरावर 30 % आरक्षण दिले. तेव्हा ते आरक्षण अंमलात आल्यावर पहिली निवडणूक कोल्हापूर महानगरपालिका ही पहिली महानगरपालिका होती. 1990 साली महिला आरक्षण महानगरपालिकामध्ये झाल्यामुळे एकूण 60 सदस्यापैकी 18 नगरसेविका निवडून आल्या होत्या 2000 साली महिला नगरसेविकांची संख्या 25 होती. तर 2005 मध्ये ती 27 झाल्याचे दिसते. म्हणजेच महिला आरक्षण नसते तर महिलांना एवढे प्रतिनिधित्व मिळाले नसते, हेच यावरुन स्पष्ट होते.

25. राखीव मतदारसंघ मिळाला नसता तर निवडणूक लढविली असती का ?

| | एकूण |
|---|---|
| होय | २५<br>९२.५९ % |
| नाही | २<br>७.४१ % |
| एकूण | २७ |
| एकूण टक्केवारी | १०० % |

राखीव मतदारसंघ मिळाला नसता तर निवडणूक लढविली असती का या प्रश्नाच्या उत्तरादाखल 25 नगरसेविकांनी होय असे उत्तर दिले असले तरी प्रत्यक्ष वस्तुस्थिती अशीच असेल असे म्हणणे धाडसाचे ठरेल.

तर 2 नगरसेविकांना आरक्षित प्रभाग मिळाला नसता तर निवडणूक लढविली नसती, असे प्रामाणिक मत दिले आहे. खुल्या प्रवर्गातून निवडणूक लढविली असती असे म्हणणाऱ्या 25 स्त्रियांपैकी 19 स्त्रियांना राजकारणाचा निवडणूकीपूर्वी अजिबात अनुभव नव्हता. हे आपण यापूर्वी पाहिले आहे. तसेच सामाजिक कामाचाही अनुभव नसलेल्या 22 स्त्रिया यामध्ये येतात. त्यामुळे सामाजिक व राजकीय कार्याचा अजिबात अनुभव नसलेल्या या स्त्रियांची खुल्या मतदार संघातून निवडणूक लढवू शकतील हे अवघड वाटते. सदर नगरसेविका खरे उत्तर न देता सोयीचे उत्तर देत आहेत अशी शंका उत्पन्न् होते.



BARR. ... KAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

**26. पुढे राखीव मतदारसंघ रद्द झाला तरी या मतदारसंघातून निवडणूक लढविणार आहात का ?**

| | एकूण |
|---|---|
| होय | २६<br>९६.३० % |
| नाही | १<br>३.७० % |
| एकूण | २७ |
| एकूण टक्केवारी | १०० % |

पुढे राखीव मतदार संघ रद्द झाला तरी या खुल्या मतदारसंघातून निवडणूक लढविणार आहात का या प्रश्नावर 26 नगरसेविकांनी होय ह्या प्रभागातून निवडणूक लढविणार असल्याचे सांगितले तर फक्त एका नगरसेविकेने नाही असे उत्तर दिले.

जरी वरील २६ स्त्रियांनी खुल्या प्रवर्गातील निवडणूक लढविणार असे उत्तर दिले असले तरी पती किंवा घरचे किती मदत करतील याबद्दल शंकाच वाटते .कारण बहुतेक सर्व स्त्रिया घराण्याचा वारसा राखण्यासाठीच महिला आरक्षित प्रवर्गातून निवडून आल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या उत्तरांच्या खरेपणाबद्दल शंका घ्यायला भरपूर वाव आहे.

**एक स्त्री म्हणून नगरपालिकेमधील कामे करताना पुरुषांच्या तुलनेने इतरांकडून जास्त सहकार्य मिळाले की अडचणी आल्या ?** या प्रश्नाच्या उत्तरादाखल सर्वच नगरसेविकांनी सहकार्य मिळत असल्याचे सांगितले.

**एक स्त्री म्हणून महानगरपालिकेतील कामांना पूर्ण वेळ देऊ शकता का ?** यावर सर्वच नगरसेविकांनी होय पूर्ण वेळ देतो असे सांगितले.

**27. निवडणूक लढविण्याची इच्छा होती. पण अजून संधी मिळाली नव्हती. मतदारसंघ राखीव पडल्यामुळे ती संधी मिळाली असे वाटते का ?**

| | एकूण |
|---|---|
| होय | २६<br>९६.३० % |
| नाही | १<br>३.७० % |
| सांगता येत नाही | १<br>३.७० % |
| एकूण | २७ |
| एकूण टक्केवारी | १०० % |

निवडणूक लढविण्याची इच्छा होती, पण अजून संधी मिळाली नव्हती. आणि मतदार संघ राखीव पडल्यामुळे ती संधी मिळाली असे वाटते का ? या प्रश्नावर असं काही नाही असे उत्तर एका नगरसेविकेने दिले तर 25 नगरसेविकांनी होय, असे वाटते असे उत्तर दिले. म्हणजे जर या महिलांना राखीव मतदारसंघ मिळाले नसते, तर त्यांची निवडणूक लढविण्याची इच्छा कदाचित अपूर्ण राहिली असती. तर एका नगरसेविकेने या प्रश्नाचे उत्तर नाही असे दिले आहे.

स्त्री- पुरूष नगरसेवकांना कांही विधानाबद्दल ते सहमत आहेत की असहमत आहेत असे विचारण्यात आले.

२८. **सर्वसाधारणपणे घरामध्ये, समाजामध्ये, राजकारणात अथवा इतर क्षेत्रामध्येही पुरुषांच्या मानाने स्त्रियांना कमी लेखले जाते.**

| सर्वसाधारणपणे घरामध्ये, समाजामध्ये, राजकारणात अथवा इतर क्षेत्रामध्येही पुरुषांच्या मानाने स्त्रियांना कमी लेखले जाते. | स्त्री / पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| अमान्य | १० | ६ | १६ |
| | ६२.५०% | ३७.५०% | १००.००% |
| | १६.३९% | ९.८४% | २६.२३% |
| | २९.४१% | २२.२२% | २६.२३% |
| मान्य | २४ | २१ | ४५ |
| | ५३.३३% | ४६.६७% | १००.००% |
| | ३९.३४% | ३४.४३% | ७३.७७% |
| | ७०.५९% | ७७.७८% | ७३.७७% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| एकूण टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

भारतीय समाजामध्ये अजूनही पुरुषप्रधान संस्कृती आहे. त्यामुळे जरी आपण 'स्त्री-पुरुष' समानतेचा उद्‌घोष केला तरी यात तथ्य किती आहे, हे पहावे लागेल.

एकूण ६१ मुलाखत घेतलेल्या नगरसेवकांपैकी १० नगरसेवकांनी व ६ नगरसेविकांनी 'सर्वसाधारणपणे घरामध्ये, समाजामध्ये, राजकारणात अथवा इतर क्षेत्रामध्येही पुरुषांच्या मानाने स्त्रियांना कमी लेखले जाते' हे विधान अमान्य असल्याचे सांगितले. त्यांची एकूण मुलाखत घेतलेल्या ६१ नगरसेवकांशी टक्केवारी पाहता अनुक्रमे १६.३४% व ९.८४ % इतकी आहे. तर वरील विधान मान्य असणा-यांमध्ये २४ पुरुषांचा व

२१ स्त्रियांचा समावेश होतो. यांचेही मुलाखत घेतलेल्या ६१ लोकांशी प्रमाण पाहता ते अनुक्रमे ३९.३४% व ३४.४३% इतके आहे.

२९. सर्वसाधारणपणे चूल व मूल इथेपर्यंतच स्त्रियांचे कार्यक्षेत्र मर्यादित असावे

| | स्त्री / पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| अमान्य | २७ | २३ | ५० |
| | **५४.००%** | **४६.००%** | **१००.००%** |
| | *४४.२६%* | *३७.७०%* | *८१.९७%* |
| | ७९.४१% | ८५.१९% | ८१.९७% |
| मान्य | ७ | ४ | ११ |
| | **६३.६४%** | **३६.३६%** | **१००.००%** |
| | *११.४८%* | *६.५६%* | *१८.०३%* |
| | २०.५९% | १४.८१% | १८.०३% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | **५५.७४%** | **४४.२६%** | **१००.००%** |
| एकूण टक्केवारी | *५५.७४%* | *४४.२६%* | *१००.००%* |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

सर्वसाधारणपणे चूल व मूल इथेपर्यंतच स्त्रियांच कार्यक्षेत्र मर्यादित असावे हे विधान अमान्य असणा-यांमध्ये २७ पुरुष व २३ स्त्रियांचा समावेश होतो, तर ७ पुरुषांना व ४ स्त्रियांना हे विधान मान्य आहे. ही चिंतेची बाब आहे.

सर्वसाधारणपणे भारतीय समाजात आजही कुटुंबातील सर्वच जबाबदा-या स्त्रियांवर असतात. म्हणजे स्त्रीने नोकरी करणे ही एखाद्या कुटुंबाची गरज असू शकते पण नोकरी करूनही स्त्रियांच्या पाठीमागची घरची जबाबदारी सुटलेली नाही. त्यामुळे स्त्रीने इतर कितीही वेगवेगळ्या क्षेत्रात भरा-या मारल्या तरी कुटुंबातील जबाबदा-या ती नाकारु शकत नाही. त्यामुळेच जवळजवळ २०% नगरसेवक / नगरसेविकांनी नकळत का होईना या गोष्टीला पुष्टी दिली आहे की सर्वसाधारणपणे चूल व मूल इथेपर्यंतच स्त्रियांचे कार्यक्षेत्र मर्यादित असावे.

हा प्रश्न मान्य करणा-यांमध्ये ५४ स्त्रियांचा समावेश होतो. स्त्रिया स्वतःच जर कुटुंबाच्या पलिकडे जावून स्वतःच्या अस्तित्वाचा विचार करायला तयार नसतील तर ती मनःस्थिती त्यांच्या राजकीय सहभागासाठी प्रतिकूल आहे.

३०. राजकारणात सक्रिय असलेल्या स्त्रीचे आपल्या संसाराकडे किंवा मुलांकडे दुर्लक्ष होते.

| | स्त्री / पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| अमान्य | ९ | १५ | २४ |
| | ३७.५०% | ६२.५०% | १००.००% |
| | १४.७५% | २४.५९% | ३९.३४% |
| | २६.४७% | ५५.५६% | ३९.३४% |
| मान्य | २५ | १२ | ३७ |
| | ६७.५७% | ३२.४३% | १००.००% |
| | ४०.९८% | १९.६७% | ६०.६६% |
| | ७३.५३% | ४४.४४% | ६०.६६% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| एकूण टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

'राजकारणात सक्रिय असलेल्या स्त्रीचे आपल्या संसाराकडे किंवा मुलांकडे दुर्लक्ष होते' या विधानाशी ९ नगरसेवक व १५ नगरसेविका असहमत असून त्यांचे एकूण मुलाखत घेतलेल्या ६१ नगरसेविकांशी प्रमाण अनुक्रमे १४.७५% व २४.५९% इतके आहे.

तर हे विधान मान्य असणा-यांमध्ये २५ नगरसेवकांचे व १२ नगरसेविकांचा समावेश होतो. यांचे मुलाखत घेतलेल्या ६१ नगरसेवकांशी प्रमाण अनुक्रमे ४०.९८% व १९.६७ इतके आहे.

सर्वसाधारणपणे स्त्रीचा संपूर्ण वेळ तिचा संसार, तिची मुले, पती किंवा इतर नातेवाईक यांच्या सरबराईतच जात असतो. त्यामुळे जेव्हा ती राजकारणासारख्या विषयाकडे वळते तेव्हा ती संसाराकडे किती वेळ देईल याबद्दल सर्वसामान्यांत प्रश्नच निर्माण होतो.

राजकारण म्हणजे लोकांशी भेटणे, त्यांच्या समस्या, प्रश्न ऐकणे, त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणे, त्यासाठी वेगवेगळ्या लोकांना भेटणे, कार्यालयांना भेटी देणे हे आलेच. शिवाय भागातल्या लोकांच्या घरी असणा-या लहान-मोठ्या कार्यक्रमांना हजेरी लावणे, त्यांच्या सुखदुःखात सहभागी होणे हे आलेच . त्यामुळेच जर एखादी स्त्री राजकारणात सक्रिय असेल तर तिचे संसाराकडे दुर्लक्ष होणे साहजिकच आहे असाच बहुतांश नगरसेवकांचा सूर होता. विशेष म्हणजे याबाबत स्त्रीला दोष देण्याकडे त्यांचा कल नव्हता. स्त्रीला नागरिक म्हणून सार्वजनिक जबाबदाऱ्या पेलताना तिच्या खाजगी जबाबदाऱ्यांचे ओझे कमी करण्याबाबत अधिक जागृती होणे आवश्यक आहे.

**३१. आज सर्वच क्षेत्रात स्त्रिया आघाडीवर असल्यामुळे त्यांच्याहितासाठी वेगळे प्रयत्न करण्याची गरज नाही.**

| | स्त्री / पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| अमान्य | १४ | २२ | ३६ |
| | **३८.८९%** | **६१.११%** | **१००.००%** |
| | *२२.९५%* | *३६.०७%* | *५९.०२%* |
| | ४१.१८% | ८१.४८% | ५९.०२% |
| मान्य | २० | ५ | २५ |
| | **८०.००%** | **२०.००%** | **१००.००%** |
| | *३२.७९%* | *८.२०%* | *४०.९८%* |
| | ५८.८२% | १८.५२% | ४०.९८% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | **५५.७४%** | **४४.२६%** | **१००.००%** |
| एकूण टक्केवारी | *५५.७४%* | *४४.२६%* | *१००.००%* |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

'आज सर्वच क्षेत्रात स्त्रिया आघाडीवर असल्यामुळे त्यांच्याहितासाठी वेगळे प्रयत्न करण्याची गरज नाही' हे विधान १४ पुरुष व २१ स्त्रियांना मान्य नाही. यावरुन कायद्याने समानता देऊ केली असली तरी ती व्यवहारात उतरण्यात येत असलेल्या अडचणीबाबत पुरुषांपेक्षा स्त्री सदस्य जास्त जागरुक असल्याचे दिसते. यावरुन पुरुष सदस्याच्या जाणीव जागृतीच्या प्रशिक्षणाची गरज अधोरेखित होते. भारतासारख्या विकसनशील देशात स्त्रियांना पुढे आणण्यासाठी प्रत्येक क्षेत्रात त्यांना संधी व प्रोत्साहन देण्याची गरज आहे. आजही काही ठिकाणी व विशेषतः ग्रामीण भागामध्ये स्त्रियांपेक्षा पुरुषांना जास्त संधी मिळते. आणि आवश्यक पात्रता असूनही स्त्रियांना मागे राहावे लागते. त्यामुळे त्यांना त्यांचे राजकीय अधिकार एक नागरिक या नात्याने समर्थपणे बजावता यावेत म्हणून अजून प्रयत्न होणे गरजेचे असल्याचे या लोकांशी बोलताना जाणवते.

तर १९ पुरुषांना व ६ स्त्रियांना हे विधान मान्य असल्याचे दिसते. एकूण मुलाखत घेतलेल्या पुरुषांशी तुलना करता यांचे प्रमाण १० % इतके आहे तर एकूण मुलाखत घेतलेल्या स्त्रियांशी तुलना करता त्यांचे प्रमाण १० % इतके आहे.

३२. राजकीय पक्षांमध्ये पुरुष सहका-यांच्या तुलनेमध्ये सर्वसाधारण महिला पक्ष कार्यकर्त्या बाजूला पडतात.

| | स्त्री / पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| अमान्य | १२ | ७ | १९ |
| | ६३.१६% | ३६.८४% | १००.००% |
| | १९.६७% | ११.४८% | ३१.१५% |
| | ३५.२९% | २५.९३% | ३१.१५% |
| मान्य | २२ | २० | ४२ |
| | ५२.३८% | ४७.६२% | १००.००% |
| | ३६.०७% | ३२.७९% | ६८.८५% |
| | ६४.७१% | ७४.०७% | ६८.८५% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| एकूण टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

राजकीय पक्षांमध्ये सर्वसाधारणपणे महिला पक्षकार्यकर्त्या बाजूला पडतात. (पुरुष सहका-यांच्या तुलनेमध्ये) यावर १२ नगरसेवक व ७ नगरसेविकांनी हे विधान अमान्य असल्याचे सांगितले. त्यांच्यामते राजकीय पक्षामध्ये स्त्री व पुरूषांना त्यांच्या गुणवत्तेनुसार संधी मिळते, तर २२ नगरसेवक व २० नगरसेविकांनी हे विधान मान्य असल्याचे सांगितले.

सर्वसाधारणपणे पुरुषांना सामाजिक व राजकीय वर्तुळात वावरण्याचा जो अनुभव असतो. तो अनुभव त्यांना महिलांपेक्षा जास्त संधी मिळविण्यात उपयोगी पडतो असे दिसते. त्याचबरोबर एका स्त्रीवर जेवढी घरची जबाबदारी असते त्यामूळे ती फावल्या वेळातच समाजकार्य किंवा राजकारण अशा ठिकाणी वेळ देऊ शकते. त्यामुळे आपला पूर्ण वेळ ते राजकारणासाठी देऊ शकतात. पक्षांच्या सभा,मोर्चे,पक्षाचे दैनंदिन कार्य, पक्ष प्रचार या कामासाठी जितका वेळ एक पुरुष उमेदवार देऊ शकतो, तितका वेळ स्त्रिया देऊ शकत

नाहीत याचाही परिणाम दोघांना मिळणा-य संधीवर होतो व स्त्रिया बाजूला पडतात असा निष्कर्ष आपण काढू शकतो.

ती जबाबदारी दोघांची आहे पण अनेक पुरुष त्या जबाबदारीत अडकून न पडता आपल्या मनाला येईल ते करत असतात पण स्त्रिया या जबाबदारीत अडकून पडतात.

**३३. एक व्यक्ती म्हणून करिअर करणे ही स्त्रीची गरज आहे.**

| | स्त्री / पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| अमान्य | ४ | ४ | ८ |
| | **५०.००%** | **५०.००%** | **१००.००%** |
| | ६.५६% | ६.५६% | १३.११% |
| | ११.७६% | १४.८१% | १३.११% |
| मान्य | ३० | २३ | ५३ |
| | **५६.६०%** | **४३.४०%** | **१००.००%** |
| | ४९.१८% | ३७.७०% | ८६.८९% |
| | ८८.२४% | ८५.१९% | ८६.८९% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | **५५.७४%** | **४४.२६%** | **१००.००%** |
| एकूण टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

एक व्यक्ती म्हणून करियर करणे ही स्त्रीची गरज आहे हे विधान ४ पुरुष व ४ स्त्रियांना अमान्य आहे. या प्रतिगामी विचारांच्या स्त्री व पुरुष नगरसेवकांच्यामते स्त्रियांनी त्यांच्यावर असलेली कौटुंबिक जबाबदारी, एक आई, एक पत्नी किंवा इतर नाती यशस्वीपणे

पार पाडणे हेच स्त्रीचे खर कर्तव्य आहे. तर ३० पुरुषांनी व २३ स्त्रियांनी हे मान्य केले आहे. त्यांची मुलाखत घेतलेल्या एकूण नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते अनुक्रमे ४९.१८% व ३७.७०% इतके दिसते.

स्त्रीला एक व्यक्ती म्हणून समाजामध्ये ज्यावेळी वेगळे स्थान मिळेल त्याचवेळी तिला एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून करिअर करणे सहज शक्य होईल. पण वरील कोष्टकामध्ये पाहता हे विधान अमान्य करणा-या ८ नगरसेवक / नगरसेविकांनी स्त्रीकडे एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून न पाहता, तिने समाजातील पारंपरिक स्त्रीची कामेच करावीत. तीच तिची खरी कर्तव्ये आहेत असे म्हटले आहे. त्यामुळे तिला वेगळ करिअर करण्याची गरजच काय ? असा प्रश्नही यांनी उभा केला आहे. एक वेळ 'पुरुषी दृष्टिकोन' म्हणून वरील ४ पुरुषांच्या म्हणण्याकडे आपण दुर्लक्ष केले तर ४ स्त्री नगरसेविकांनी याच प्रकारचे मत व्यक्त करावे हे आश्चर्यचकित करणारे आहे. शिक्षणाचा अभाव व सामाजिक जाणिवांचा अभाव हेही यामागील कारण असू शकेल. अद्यापही स्त्रीला एक स्वतंत्र स्वायत्त नागरिक म्हणून पाहण्याची समाजाची तयारी झालेली नाही ही चिंतेची बाब आहे.

३४. कुटुंबाचे विरोधात जाऊन एखाद्या स्त्रीने राजकारणात प्रवेश केला तर ते तिला जास्त कठीण जाते.

| | स्त्री / पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| अमान्य | ३ | ६ | ९ |
| | ३३.३३% | ६६.६७% | १००.००% |
| | ४.९२% | ९.८४% | १४.७५% |
| | ८.८२% | २२.२२% | १४.७५% |
| मान्य | ३१ | २१ | ५२ |
| | ५९.६२% | ४०.३८% | १००.००% |
| | ५०.८२% | ३४.४३% | ८५.२५% |
| | ९१.१८% | ७७.७८% | ८५.२५% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| एकूण टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

कुटुंबाच्या विरोधात जाऊन एखाद्या स्त्रीने राजकारणात प्रवेश केला तर ते तिला जास्त कठीण जाते या विधानाशी ३ नगरसेवक व ६ नगरसेविका असहमत आहेत म्हणजेच हे विधान त्यांना अमान्य आहे. त्यांचे एकूण मुलाखत घेतलेल्या ६१ नगरसेवकांशी तुलना करता त्यांचे प्रमाण १४.७५% इतके दिसते त्यात स्त्रिया ९.८४% तर पुरुष ४.९२% इरके आहेत.

तर वरील विधान मान्य आहे असे म्हणणा-यांमध्ये ३१ पुरुषांचा व २२ स्त्रियांचा समावेश होतो. याच एकूण मुलाखत घेतलेल्या नगरसेवकांशी प्रमाण अनुक्रमे ५०.८२% व ३४.४३ इतके दिसते.

आज निवडणुकीला उभ्या राहणा-या बहुतेक स्त्रिया या आर्थिकदृष्ट्या सक्षम असतील तर त्यांना कुटुंबाच्या विरोधात जाऊनही राजकारणात जाता येईल. पण जर त्यांना आर्थिकदृष्ट्या कुटुंबावर अवलंबून राहावे लागत असेल तर मात्र तिला ते जास्तच कठीण जाते. समजा एखादी स्त्री स्वतः अर्थार्जन करीत असेलही पण काही-काही ठिकाणी तिने मिळवलेले पैसे खर्च करण्यासाठीसुद्धा तिला घरच्यांची किंवा पतीची इच्छा विचारात घ्यावी लागते अशी परिस्थिती दिसते. मग ज्या स्त्रिया स्वतः अर्थार्जन करीत नाहीत त्यांची तर गोष्टच वेगळी. अर्थार्जन करीत असो वा नसो, राजकीय प्रवेश करताना सर्वसाधारण कुटुंबाच्या विरोधात जाणार नाही एवढे नक्की, कारण त्यामुळे तिला समाजाकडून विरोध होईल शिवाय आर्थिक उत्पन्न, पुरेसा राजकीय अनुभव, व्यावसायिक संबंधामुळे मिळू शकणारे फायदे किंवा सामाजिक वर्तुळामध्ये असणारा प्रभाव या सर्वांचीच वानवा असल्याने इच्छा असूनही ती कुटुंबाच्या विरोधात जाण्याचे धाडस करणार नाही.

**३५. सर्वसाधारणपणे मतदार संघ राखीव पडला तर अगोदर निवडून आलेल्या उमेदवाराची पत्नी किंवा घरातील तत्सम व्यक्तींनाच जास्त संधी मिळते.**

| | स्त्री / पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| अमान्य | ६ | ६ | १२ |
| | **५०.००%** | **५०.००%** | **१००.००%** |
| | *९.८४%* | *९.८४%* | *१९.६७%* |
| | १७.६५% | २२.२२% | १९.६७% |
| मान्य | २८ | २१ | ४९ |
| | **५७.१४%** | **४२.८६%** | **१००.००%** |
| | *४५.९०%* | *३४.४३%* | *८०.३३%* |
| | ८२.३५% | ७७.७८% | ८०.३३% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | **५५.७४%** | **४४.२६%** | **१००.००%** |
| एकूण टक्केवारी | *५५.७४%* | *४४.२६%* | *१००.००%* |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

सर्वसाधारणपणे मतदार संघ राखीव पडला तर अगोदर निवडून आलेल्या उमेदवाराची पत्नी किंवा घरातील तत्सम व्यक्तींनाच जास्त संधी मिळते हे विधान ६ नगरसेवक व ६ नगरसेविकांनी अमान्य केले आहे. तर २८नगरसेवक व २१ नगरसेविकांनी मान्य असल्याचे म्हटले आहे.

याला कारण त्यांच्या वॉर्डमध्ये त्या विशिष्ट घरातील व्यक्तीने त्या त्या मतदारसंघात केलेली कामे, त्या मतदार संघात त्या घराचे असलेले वलय, त्याची लोकप्रियता, सामाजिक

संपर्क, अगदी वर पर्यंत असलेला संपर्क या सर्वांमुळे आरक्षणानंतर पूर्वीच्या उमेदवाराच्या घरच्यांनाच जास्त संधी मिळते. या महानगरपालिकेत सध्या कार्यरत असणा-या नगरसेवकांपैकी जवळजवळ निम्मे नगरसेवक पूर्वी निवडून आलेले आहेत किंवा त्यांच्या घरातील दुसरे कोणी अगोदर नगरसेवक म्हणून कार्य केले आहे.

३६. मुळातच पक्ष कार्यकर्ती असलेली स्त्री व राजकीय बाहुली स्त्री यांचे परस्परांशी फारसे सख्य नसते.

| | स्त्री / पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| अमान्य | ८ | १३ | २१ |
| | ३८.१०% | ६१.९०% | १००.००% |
| | १३.११% | २१.३१% | ३४.४३% |
| | २३.५३% | ४८.१५% | ३४.४३% |
| मान्य | २६ | १४ | ४० |
| | ६५.००% | ३५.००% | १००.००% |
| | ४२.६२% | २२.९५% | ६५.५७% |
| | ७६.४७% | ५१.८५% | ६५.५७% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| एकूण टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

मुळातच पक्ष कार्यकर्ती असलेली स्त्री व राजकीय बाहूली स्त्री यांचे परस्परांशी फारसे सख्य नसते हे विधान ८ पुरुष व १३ स्त्रियांनी अमान्य केले आहे. यांचे एकूण मुलाखत घेतलेल्या नगरसेविकांशी प्रमाण पाहता ते अनुक्रमे २३.५५% व ४८.१५% इतके दिसते. तर २५ नगरसेवक व १४ नगरसेविका असे एकूण ४० जणांनी हे विधान मान्य असल्याचे सांगितले. त्यांचे मुलाखत घेतलेल्या एकूण नगरसेविकांशी प्रमाण पाहता ते अनुक्रमे ४२.६२% व २२.९५% इतके दिसते.

मुळातच पक्षकार्यकर्त्या स्त्रीला पक्षातर्फे तिकीट मिळविताना थोडा का असेना संघर्ष करावा लागतो तर ज्यांना राजकीय वारशामुळे तिकीट मिळविताना अजिबात संघर्ष करावा लागत नाही. ज्या मुळातच पक्ष कार्यकर्त्या असतात त्यांना समाजातील प्रश्नांची जाण चांगल्याप्रकारे असते, त्या अशा प्रश्नांकडे एक स्त्री म्हणून पाहता तो प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करतात तर राजकी य बाहूली किंवा राजकीय घराण्यातून पुढे आलेल्या स्त्रीची कामे बहुधा तिचे पतीच बघत असतात. त्यामुळेही कदाचित एखादा प्रश्न सोडविताना या दोघांची मते वेगवेगळी असू शकतात या शिवाय राजकीय बाहुली स्त्रीला पक्षात किंवा इतरही ठिकाणी मिळणारी मानसन्मानाची पदे ही विनाप्रयास मिळत असतात यामुळे या दोघींमध्ये थोडे फार वितुष्ट असते असे म्हणायला काही हरकत नाही.

३७. महिला उमेदवारांनी फक्त महिलांच्यासाठी राखीव मतदार संघातूनच निवडणूक लढवावी.

| | स्त्री / पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| अमान्य | २० | २४ | ४४ |
| | ४५.४५% | ५४.५५% | १००.००% |
| | ३२.७९% | ३९.३४% | ७२.१३% |
| | ५८.८२% | ८८.८९% | ७२.१३% |
| मान्य | १४ | ३ | १७ |
| | ८२.३५% | १७.६५% | १००.००% |
| | २२.९५% | ४.९२% | २७.८७% |
| | ४१.१८% | ११.११% | २७.८७% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| एकूण टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

महिला उमेदवारांनी फक्त महिलांच्यासाठी राखीव मतदार संघातूनच निवडणूक लढवावी हे विधान २० पुरुष व २४ स्त्रियांनी अमान्य केले आहे. यांचे एकूण निवडून आलेल्या नगरसेवकांशी प्रमाण अनुक्रमे ३२.६९% व ३९.३४% इतके आहे.तर १४ नगरसेवक व ३ नगरसेवकांनी हे विधान मान्य केले आहे. यांचे मुलाखत घेतलेल्या एकूण नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते अनुक्रमे २२.९५% व ४.९२% इतके आहे.

महिलांनी खुल्या प्रभागातुन निवडणुक लढऊ नये अशी इच्छा तीन नगरसेविकांनी प्रदर्शित करणे म्हणजेच महिलांचा किमान सहभाग निश्चित करण्यासाठी

देण्यात आलेले आरक्षण, हे त्यांच्या अंतिम राजकीय सहभागाची मर्यादाच आहे. असे मानण्या जोगे आहे.

महिलांना राखीव मतदार संघ मिळाले म्हणजे बाकीचे राहिलेले मतदारसंघ (खुले मतदारसंघ) हे फक्त पुरुषांसाठीचे आहेत असेही कांहींनी सुचविले आणि ज्या तीन महिलांनी हे विधान मान्य केले आहे त्यांचाही समज बहुधा असाच झाला असावा तर आहे त्या मतदारसंघासाठी योग्य उमेदवार मिळत नसताना विनाकारण खुल्या मतदारसंघातील जागा का अडवता ? असा प्रश्नही काही नगरसेवकांनी केला. स्त्री पुरुष समानतेबाबत जाणीव विकसित करण्यासाठी कसोशिने प्रयत्न होणे गरजेचे आहे हेच यावरुन स्पष्ट होते.

३८. पुरुष नगरसेवकांच्या तुलनेत स्त्री नगरसेवक आपला पुरेसा वेळ नगरसेवक म्हणून काम करताना देऊ शकत नाही.

| | स्त्री / पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| अमान्य | ८ | ८ | १६ |
| | ५०.००% | ५०.००% | १००.००% |
| | १३.११% | १३.११% | २६.२३% |
| | २३.५३% | २९.६३% | २६.२३% |
| मान्य | २६ | १९ | ४५ |
| | ५७.७८% | ४२.२२% | १००.००% |
| | ४२.६२% | ३१.१५% | ७३.७७% |
| | ७६.४७% | ७०.३७% | ७३.७७% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| एकूण टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

पुरुष नगरसेवकांच्या तुलनेत स्त्री नगरसेवक आपला पुरेसा वेळ नगरसेवक म्हणून काम करताना देऊ शकत नाही हे विधान ८ पुरुष व ८ स्त्रियांनी अमान्य केले आहे. त्यांचे मुलाखत घेतलेल्या एकूण ६१ नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते अनुक्रमे १३.११% व १३.११% इतके दिसते.पुरुष नगरसेवकांना घरची कोणतीही जबाबदारी नसते त्यामुळे ते आपला पूर्ण वेळ नगरसेवक म्हणून देऊ शकतात तर स्त्री नगरसेवकांना घरची सगळी जबाबदारी सांभाळून नगरसेवकांमधील कामांना वेळ देतात त्यामुळे तुलनेने पुरुषांपेक्षा स्त्री नगरसेवक आपला पुरेसा वेळ नगरसेवक म्हणून काम करताना वेळ देऊ शकत

नाहीत.यामुळे सार्वजनिक जीवनासाठी वेळ देण्याकरिता स्त्रियांना आवश्यक ते स्वातंत्र्य अनुभवता आले पाहिजे हे स्पष्ट होते. त्यानुसार घरातील श्रमविभागणी बदलली पाहिजे.

**३९. एखादा धाडसी निर्णय घेताना स्त्री नगरसेवक पुरुष नगरसेवकांपेक्षा कमी पडतात**

| | स्त्री / पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| अमान्य | ९ | १० | १९ |
| | **४७.३७%** | **५२.६३%** | **१००.००%** |
| | *१४.७५%* | *१६.३९%* | *३१.१५%* |
| | २६.४७% | ३७.०४% | ३१.१५% |
| मान्य | २५ | १७ | ४२ |
| | **५९.५२%** | **४०.४८%** | **१००.००%** |
| | *४०.९८%* | *२७.८७%* | *६८.८५%* |
| | ७३.५३% | ६२.९६% | ६८.८५% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | **५५.७४%** | **४४.२६%** | **१००.००%** |
| एकूण टक्केवारी | *५५.७४%* | *४४.२६%* | *१००.००%* |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

एखादा धाडसी निर्णय घेताना स्त्री नगरसेवक पुरुष नगरसेवकापेक्षा कमी पडतात हे विधान ९ नगरसेवक व १० नगरसेविकांनी अमान्य केले आहे. त्यांचे एकूण मुलाखत घेतलेल्या नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते अनुक्रमे १४.७५% व १६.३९% दिसते. तर २५ पुरुषांना व १७ स्त्रियांना हे विधान मान्य आहे. त्यांचे एकूण मुलाखत घेतलेल्या नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते अनुक्रमे ४०.९८% व २७.८७ इतके दिसते. हे विधान मान्य करणा-यांच्या मते धडाडी किंवा धाडसी वृत्ती ही पुरुषांजवळ असते. स्त्रियांना सामाजिक व

राजकीय कामाचाही अनुभव कमी असल्यामुळे धाडसी निर्णय घेताना स्त्री नगरसेवक पुरुष नगरसेवकपेक्षा कमी पडतात असे सांगतात.

प्रत्यक्षात आजपर्यंत ३/३ किंवा ६/६ महिन्यांचे महापौर पाहिलेल्या कोल्हापूर महानगरपालिकेमध्ये श्रीमती सई खराडे यांच्या रुपाने एक धाडसी व कणखर` महापौर पाहिला आहे. प्रत्यक्षात १० महिने महापौर पदाची मुदत अडीच वर्षे आहे आणि ती पूर्ण झाल्याशिवाय मी राजीनामा देणार नाही असे सांगुन, सईंनी राजीनामा देण्याचे नाकारुन स्त्रियांना कमजोर समजणा-यांना चांगलाच धडा दिला होता.

## ४०. निवडणूक प्रचाराची मोहीम कुणी सांभाळली

| निवडणूक प्रचाराची मोहीम कुणी सांभाळली | स्त्री व पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| मागे राहून मार्गदर्शन केले | २ | ८ | १० |
| | २०.००% | ८०.००% | १००.००% |
| | ३.२८% | १३.११% | १६.३९% |
| | ५.८८% | २९.६३% | १६.३९% |
| पतींच्या सहकार्याने | | १४ | १४ |
| | ०.००% | १००.००% | १००.००% |
| | ०.००% | २२.९५% | २२.९५% |
| | ०.००% | ५१.८५% | २२.९५% |
| स्वतः सांभाळली | ३२ | ५ | ३७ |
| | ८६.४९% | १३.५१% | १००.००% |
| | ५२.४६% | ८.२०% | ६०.६६% |
| | ९४.१२% | १८.५२% | ६०.६६% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| एकूण टक्केवारी | ५५.७४% | ४४.२६% | १००.००% |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | | | |

निवडणूक प्रचाराची मोहीम कुणी सांभाळली ? या प्रश्नावर २ नगरसेवक व ८ नगरसेविकांनी 'आम्ही मागे राहून मार्गदर्शन केले' व प्रत्यक्ष मोहीम कार्यकर्त्यांनी सांभाळल्याचे सांगितले. यांचे मुलाखत घेतलेल्या नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते अनुक्रमे ३.२८% व १३.११% इतके दिसते.

'पतींच्या सहकार्याने' निवडणूक प्रचाराची रणधुमाळी सांभाळली असे सांगणा-या १४ नगरसेविका महानगरपालिकेत कार्यरत आहेत. त्यांचे एकूण मुलाखत घेतलेल्या नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते २२.९५% इतके आहे, तर मुलाखत घेतलेल्या २७ नगरसेविकांशी यांची तुलना करता हे प्रमाण निम्म्यापेक्षा अधिक म्हणजेच ५१.८५% इतके दिसते.

निवडणूक प्रचारादरम्यान प्रचाराची रणधुमाळी स्वतः सांभाळली असे सांगणा-यांमध्ये ३२ नगरसेवक व ५ नगरसेविकांचा समावेश होतो. त्यांचे मुलाखत घेतलेल्या एकूण नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते अनुक्रमे ५५.४६% व ८.२०% इतके दिसते.

वरील कोष्टकावरुन आपण असे म्हणू शकतो की जास्तीत जास्त पुरुषांनी निवडणूक प्रचाराची रणधुमाळी स्वतः सांभाळली होती तर निम्म्या नगरसेविकांनी त्यासाठी आपल्या पतींचे सहकार्य घेतले.

४१. नगरसेवक म्हणून निवडून आल्यावर सामाजिक दर्जात पडलेला फरक

| नगरसेवक म्हणून निवडून आल्यावर सामाजिक दर्जात पडलेला फरक | स्त्री व पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| होय | २६ | २६ | ५२ |
| | **५०.००%** | **५०.००%** | **१००.००%** |
| | *४२.६२%* | *४२.६२%* | *८५.२५%* |
| | ७६.४७% | ९६.३०% | ८५.२५% |
| विशेष नाही | १ | | १ |
| | **१००.००%** | **०.००%** | **१००.००%** |
| | *१.६४%* | *०.००%* | *१.६४%* |
| | २.९४% | ०.००% | १.६४% |
| नाही | ७ | १ | ८ |
| | **८७.५०%** | **१२.५०%** | **१००.००%** |
| | *११.४८%* | *१.६४%* | *१३.११%* |
| | २०.५९% | ३.७०% | १३.११% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | **५५.७४%** | **४४.२६%** | **१००.००%** |
| एकूण टक्केवारी | *५५.७४%* | *४४.२६%* | *१००.००%* |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

नगरसेवक म्हणून निवडून आल्यावर सामाजिक दर्जात पडलेला फरक पडला आहे असे म्हणणा-यांमध्ये २६ नगरसेवक व २६ नगरसेविकांचा समावेश होतो. मुलाखत घेतलेल्या ६१ नगरसेवकांशी तुलना करता त्यांचे प्रमाण ४२.६२% इतके आहे.

नगरसेवक म्हणून निवडून आल्यामुळे सामाजिक दर्जात विशेष फरक पडला नाही असे म्हणणा-यांमध्ये फक्त एका नगरसेवकाचा समावेश होतो. तर नगरसेवक म्हणून निवडून आल्यामुळे सामाजिक दर्जात काही फरक पडलेला नाही . असे म्हणणा-यांमध्ये ७ नगरसेवक व १ नगरसेविकेचा समावेश होतो. मुलाखत घेतलेल्या ६१ नगरसेवकांशी तुलना करता त्यांचे प्रमाण अनुक्रमे ११.४८% व १.६४% इतके होते.

यावरून असे म्हणता येईल की पद मिळाल्यामुळे सामाजिक दर्जात फरक पडलेल्यामध्ये स्त्रियांइतक्याच पुरुषांचाही समावेश आहे. या सर्वांच्या मते नगरसेवक पद मिळाल्यामुळे समाजामध्ये पूर्वीपेक्षा अधिक मान-मरातब मिळतो. कदाचित पुरुषांच्या सामाजिक दर्जात फारसा फरक पडला असे सांगणाऱ्या पुरुषांचे प्रमाण कमी असण्याचे कारण म्हणजे निवडणूकीपूर्वीही हे सर्व सामाजिकदृष्ट्या सक्रिय होते तर बहुतेक स्त्रियांना निवडून आल्यामुळे समाजात सावरण्याची संधी मिळाली हे आहे.

पण स्त्रियांना मात्र हा फरक फारच जाणवत असेल. पद मिळण्यापूर्वी सामाजिक व कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग अगदीच अल्पसा असला तरी आता पद मिळाल्यानंतर प्रत्येक निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग महत्त्वाचा मानला जात आहे.

कोल्हापूर महानगरपालिकेतील आरक्षणापूर्वी म्हणजे १९९० पुर्वी महानगरपालिका सदस्यांची यादी पहिली तर त्यामध्ये एकही स्त्री सदस्या नसल्याचे आढळते. मात्र आरक्षण मिळाल्यानंतर प्रत्येक निवडणुकीच्यावेळी त्यांच्या संख्येत वाढ झाल्याचे आढळते. महिलांना ३३% आरक्षण मिळाल्यामुळे ग्रामीण व शहरी या दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्यांचा राजकीय सहभाग वाढल्याचे दिसते. समाजातील अगदी वरच्या स्तरापासून अगदी तळागाळातल्या स्तरातील स्त्रियांनाही राजकीय सहभागाची संधी प्राप्त झाली आहे. कोल्हापूर महानगरपालिकेत सध्या विद्यमान असलेल्या नगरसेविका समाजातील वेगवेगळ्या जाती-धर्मातून निवडून आल्या आहेतच शिवाय अगदी विषम आर्थिक, राजकिय सामाजिक व शैक्षणिक परिस्थिती असलेल्या घरातून निवडून आल्या आहेत. त्याबद्दल श्रीमती मंगल बाबासाहेब ठोकळे यांचे उदाहरण पूरक ठरेल. श्रीमती मंगल ठोकळे या समाजातील एका मागासवर्गीय जातीमध्ये जन्माला आल्या. अगदी गरीबीची परिस्थिती त्यामुळे शिक्षणही अजिबात झाल नाही. अशा सामाजिक, आर्थिक, राजकीय किंवा शैक्षणिक दृष्ट्या कोणतीही बाजू भक्कम नसतानाही आरक्षणामुळे त्यांना राजकीय सहभागाची संधी मिळाली. जर

आरक्षण मिळाले नसते तर श्रीमती मंगल ढोकळेसारख्या कितीतरी स्त्रियांना राजकारणाचे दालन कधीच उघडले गेले नसते.

**४२. राजकारणात टिकून राहण्यासाठी वरदस्ताची गरज असते काय ?**

| राजकारणात टिकून राहण्यासाठी वरदस्ताची गरज असते काय ? | स्त्री व पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| दोघांनाही गरज असते | ११ | ४ | १५ |
| | **७३.३३%** | **२६.६७%** | **१००.००%** |
| | *१८.०३%* | *६.५६%* | *२४.५९%* |
| | 32.34% | 14.81% | 24.59% |
| दोघांनाही गरज नसते | ४ | १ | ५ |
| | **८०.००%** | **२०.००%** | **१००.००%** |
| | *६.५६%* | *१.६४%* | *८.२०%* |
| | ११.७६% | ३.७०% | ८.२०% |
| महिलांना गरज असते | १९ | २२ | ४१ |
| | **४६.३४%** | **५३.६६%** | **१००.००%** |
| | *३१.१५%* | *३६.०७%* | *६७.२१%* |
| | ५५.८८% | ८१.४८% | ६७.२१% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | **५५.७४%** | **४४.२६%** | **१००.००%** |
| एकूण टक्केवारी | *५५.७४%* | *४४.२६%* | *१००.००%* |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

राजकारणात प्रवेशासाठी किंवा टिकून राहण्यासाठी वरदहस्ताची गरज असते काय? या प्रश्नावर स्त्री व पुरुष दोघानांही वरदहस्ताची गरज असते असे म्हणणा-यांमध्ये १४

नगरसेवकांचा व ४ नगरसेविकांचा समावेश होतो. यांची एकूण मुलाखत घेतेलेल्या नगरसेवकांशी तुलना करता ते प्रमाण अनुक्रमे १८.०३% व ६.५६% इतके दिसते.

तर दोघांनाही वरदहस्ताची गरज नसते असे म्हणणा-यांमध्ये ४ नगरसेवक व १ नगरसेविकेचा समावेश होतो. या मुलाखत घेतलेल्या एकूण नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते अनुक्रमे ६.५६% व १.६४% इतके आहे.

राजकारणात प्रवेशासाठी किंवा टिकून राहण्यासाठी फक्त महिलांनाच वरदहस्ताची गरज असते, असे म्हणणा-यांमध्ये १९ नगरसेवकांचा व २२ नगरसेविकांचा समावेश होतो. एकूण मुलाखत घेतलेल्या नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते अनुक्रमे ३१.१५% व ३६.०७% इतके आहे.

एकूण मुलाखत घेतलेल्या ५५.८८% पुरुषांनी व ८१.४८% स्त्रियांनी जेव्हा राजकारणात प्रवेशासाठी किंवा टिकून राहण्यासाठी वरदहस्ताची गरज महिलांना असते असे सांगतात. यावरुन राजकारणात टिकून राहण्यासाठी सर्वसामांन्य पुरुषापेक्षा सर्वसामान्य स्त्रीला परिस्थिती प्रतिकूल असते याची जाणीव दोघांमध्येही असल्याचे जाणवते.

४३. महिलांना सत्तेत वाटा मिळाल्यामुळे राजकारणाचे शुद्धीकरण होईल किंवा कसे ?

| महिलांना सत्तेत वाटा मिळाल्यामुळे राजकारणाचे शुद्धीकरण होईल किंवा कसे ? | स्त्री व पुरुष | | |
|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण |
| होय | २० | २५ | ४५ |
| | **४४.४४%** | **५५.५६%** | **१००.००%** |
| | *३२.७९%* | *४०.९८%* | *७३.७७%* |
| | ५८.८२% | ९२.५९% | ७३.७७% |
| नाही | १३ | | १३ |
| | **१००.००%** | **०.००%** | **१००.००%** |
| | *२१.३१%* | *०.००%* | *२१.३१%* |
| | ३८.२४% | ०.००% | २१.३१% |
| सांगता येत नाही | १ | २ | ३ |
| | **३३.३३%** | **६६.६७%** | **१००.००%** |
| | *१.६४%* | *३.२८%* | *४.९२%* |
| | २.९४% | ७.४१% | ४.९२% |
| एकूण | ३४ | २७ | ६१ |
| आडव्या रकान्यातील टक्केवारी | **५५.७४%** | **४४.२६%** | **१००.००%** |
| एकूण टक्केवारी | *५५.७४%* | *४४.२६%* | *१००.००%* |
| उभ्या रकान्यातील टक्केवारी | १००.००% | १००.००% | १००.००% |

महिलांना सत्तेत वाटा मिळाल्यामुळे राजकारणाचे शुद्धीकरण होईल किंवा कसे ? या प्रश्नावर होय असे उत्तर देणा-यांमध्ये २० नगरसेवक व २५ नगरसेविकांचा समावेश होतो यांचे मुलाखत घेतलेल्या नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते अनुक्रमे ३२.७९% व ४०.९८% इतके दिसते.

महिलांना सत्तेत वाटा मिळाल्यामुळे राजकारणाचे शुद्धीकरण होणार नाही अस मानणा-यांमध्ये १३ नगरसेवकांचा समावेश होतो. यांचे एकूण मुलाखत घेतलेल्या नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते २१.३१% इतके आहे. शेवटी वस्तुतः राजकारणी स्त्रियांकडून होणाऱ्या भ्रष्टाचाराची भरपूर उदाहरणे समोर असताना असा प्रतिसाद मिळणे आश्चर्यकारक आहे.

महिलांना सत्तेत वाटा मिळाल्यामुळे राजकारणाचे शुद्धीकरण होईल असे नक्की सांगता येत नाही असे म्हणणा-यांमध्ये १ पुरुष सदस्याचा व २ स्त्री सदस्यांचा समावेश होतो. यांचे मुलाखत घेतलेल्या एकूण नगरसेवकांशी प्रमाण पाहता ते अनुक्रमे १.६४% व ३.२८% इतके असल्याचे दिसते.

यावरुन एकूण मुलाखत घेतलेल्या ३४ नगरसेवकांपैकी २० नगरसेवकांना टक्केवारीत बोलायचे झाल्यास ५८.८२% नगरसेवकांना व एकूण २७ नगरसेविकांपैकी २५ नगरसेविकांना म्हणजेच ९२.५९% नगरसेविकांना पुरुषांच्या तुलनेने महिला कमी भ्रष्टाचार करतील किंवा भ्रष्टाचार करणात नाहीत त्यामुळे महिलांना सत्तेत वाटा मिळाल्यामुळे राजकारणाचे शुद्धीकरण होईल असे म्हटले असावे.

उपरोक्त सर्व माहितीतून नगरसेवक स्त्री-पुरुषांच्या सहभागातील साम्य व भेद यासंबंधीचे निष्कर्ष पुढील प्रमाणे सादर केले आहेत.